बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८९८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २० | बुधवार,दि.२० एप्रिल २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# दोन दशकांत वणव्यांत १० टक्क्यांनी वाढ

**नागपूर :** भारतातील जंगलांना आगी लागण्याच्या घटनांमध्ये गेल्या दोन दशकांत दहा पटीने वाढ झाली आहे. एवढेच नाही तर भारतातील ३० टक्क्यांहून अधिक जिल्ह्यात आगीच्या मोठया घटना घडण्याची शक्यता आहे. ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने (कौन्सिल ऑफ एनर्जी, एन्वायर्नमेंट अँड वॉटर) केलेल्या अभ्यासातून ही बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, जंगलातील आगींसाठी महाराष्ट्रातील गडचिरोली हा जिल्हा सर्वाधिक असुरक्षित असल्याची बाबदेखील यातून समोर आली आहे.



गोंदिया जिल्ह्यात वन-क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. वनविभागाची ५६ वर्तुळे असून २७४ बीट आहेत. तर १२ वनक्षेत्र आहेत. २ लाख ५४ हजार हेक्टर क्षेत्रफळ वनक्षेत्र येत असताना पैकी १ लाख ७३ हजार हेक्टर क्षेत्रफळ वनविभागाच्या अख्त्यारित येतो. त्याच बरोबर वन्यजीवविभागाचे नागझिरा, न्यू नागझिरा , नवे-गाव, बोंडे, डोंगरगाव, पिटेझरी , उमरझरी, कोका असे रेंज आहेत. तर वन विकास महामंडळाचेही जंगल क्षेत्र बऱ्याच पैकी आहे. जिल्ह्यात उन्हाळ्यात सरासरी ४० ते ४५ सेल्सिअस तापमान राहत असल्याने वनक्षेत्रात कुठे ना कुठे उन्हाळ्यात वणवाच्या घटना घडतात. त्यामुळे, वन विभागाकडून दरवषी जनजागृती करण्यासोबतच फायर वॉचर्सच्या मदतीने वणव्याच्या घटनांवर विशेष लक्षत असते. असे असले तरी वणव्याच्या घटना या नित्याच्याच होत आहेत.

महाराष्ट्रासह मिझोरम, ओडिशा, मध्यप्रदेश, आसाम यांसारखी राज्ये देशातील अग्रगण्य जंगलात आगीचे "हॉटस्पॉट' ठरली आहेत. २००० ते २००९ या कालावधीत महाराष्ट्रातील चंद्रपूर आणि गडचिरोली हे दोन जिल्हे आगीचे "हॉटस्पॉट' होते. २०१० ते २०१९ पर्यत या यादीत गडचिरोली हा जिल्हाही होता. याच कालावधीत हा जिल्हा सर्वाधिक प्रभावित जिल्ह्यांमध्ये आठव्या क्रमांकावर होता.

अलीकडच्या दशकांमध्ये जंगलातील अग्निशामक व्यवस्थापन प्रणालीत लक्षणीय सुधारणा झाली असली तरी सहा वर्षांत जंगलातील आगीच्या सूचनांमध्ये १४ पटीने वाढ झाल्याचा दाव-ादेखील या अभ्यासात करण्यात आला आहे. त्यामुळे अग्निशामक व्यवस्थापन प्रणाली आणखी मजबूत करण्याची गरजही यात व्यक्त करण्यात आली आहे. ०१७ ते २०२० या कालावधीत भार-तातील वणवा प्रतिबंधक आणि व्यवस्थापन योजनेअंतर्गत वणवा व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या आर्थिक संसाधनांचे वाटप केवळ ३.४ टक्क्यांनी वाढले आहे. भार-तातील २७५ दशलक्षाहून अधिक लोक जंगलातील आगीच्या गंभीर घटनांना सामोरे जातात, असेदेखील या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

अनेक राज्यांत घटना: ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेचा अहवाल प्रकाशित होण्यापूर्वी "इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट'चा अहवाल प्रकाशित झाला. या अहवालात देखील महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा या राज्यात २०१९-२०२० मध्ये आगीच्या सर्वाधिक घटना घडल्या. तसेच महाराष्ट्रातील गडचिरोली, ओडिशातील कंधमाल, कर्नाटकातील बीजापूर हे तीन जिल्हे या कालावधीत आगीमुळे सर्वाधिक प्रभावित झाल्याचे नमूद आहे.

याशिवाय ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेच्या अहवालात २००० ते २०१९ या कालावधीत आंध्र प्रदेश, आसाम, छत्तीसगड, ओडिशा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, मणिपूर, मिझोरम, नागालँड आणि उत्तराखंडच्या जंगलात आगीच्या सर्वाधिक घटना घडल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

# नागपुरचे सुपुत्र लेफ्टनंट जनरल मनोज पांडे नवे लष्कर प्रमुख

**नवी दिल्ली :** केंद्र शासनाने महाराष्ट्राचे सुपुत्र ले. जनरल मनोज पांडे यांची भारतीय सैन्यदलाचे नवे लष्करप्रमुख म्हणून निवड केली आहे. विद्यमान लष्करप्रमुख महाराष्ट्राचेच सुपुत्र जनरल मनोज मुकुंद नरवणे सेवानिवृत्त होत असून ले.जनरल मनोज पांडे हे ३० एप्रिल २०२२ रोजी त्यांचा पदभार स्विकारतील.



केंद्र सरकार व संरक्षण मंत्रालयातील उच्चपदस्थ समितीने सेवा ज्येष्ठतेनुसार ले.जनरल पांडे यांची देशाचे आगामी लष्करप्रमुख म्हणून निवड केली आहे. मुळचे नागपूरचे असलेले ले.जनरल पांडे यांच्या निवडीमुळे ले.जनरल नर-वणे यांच्यानंतर देशाच्या लष्कर प्रमुखपदी ले.जनरल मनोज पांडे यांच्या रुपाने महाराष्ट्राचे सुपुत्र सलग दुसऱ्यांदा हे पद भूषविणार आहेत.

ले.जनरल मनोज पांडे यांनी १ फेब्रुवारी २०२२ रोजी लष्कराच्या उपप्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच, यावर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला त्यांना उल्लेखनीय योगदानासाठी "परम विशिष्ट सेवा पदक' जाहीर झाले आहे.

**ले.ज. मनोज पांडे तिसरे मराठी लष्कर प्रमुख**

ले.ज. मनोज पांडे यांच्या रुपाने मराठी माणूस देशाच्या लष्कराच्या सर्वोच्च पदी विराजमान होणार आहे. या पदावरील ते तिसरे मराठी अधिकारी असतील. यापूर्वी जनरल अरूण कुमार वैद्य या मराठी अधिकाऱ्याला १९८३ ते १९८६ या कालावधीत देशाच्या लष्कर प्रमुखपदाचा बहुमान मिळाला आहे. विद्यमान लष्कर प्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी ३१ डिसेंबर २०१९ रोजी या पदाची सुत्रे स्वीकारली होती.

**ले.ज. मनोज पांडे यांच्या विषयी**

ले. ज. मनोज पांडे हे पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी असून, डिसेंबर १९८२ मध्ये कोअर ऑफ इंजिनियर्स (द बॉम्बे सॅपर्स) मध्ये ते नियुक्त झाले. जनरल ऑफिसर म्हणून त्यांनी जम्मू आणि काश्मीरच्या नियंत्रण रेषेजवळील संवेदनशील पल्लनवाला क्षेत्रात ऑपरेशन पराक्रम दरम्यान इंजिनीअर रेजिमेंटचे नेतृत्व केलेले आहे. ते स्टाफ कॉलेज, कॅम्बरली (युनायटेड किंगडम)चे पदवीधर आहेत. त्यांनी हायर कमांड (एचसी) आणि नॅशनल डिफेन्स कॉलेज (एनडीसी) अभ्यासक्रमांचे शिक्षण घेतलेले आहे.

लष्करातील ३९ वर्षांच्या कारकिर्दीत, त्यांनी विविध महत्वाच्या पदांची यशस्वीपणे जबादारी सांभाळली आहे. यात वेस्टर्न थिएटरमधील स्ट्राइक कोरच्या इंजिनिअर ब्रिगेडचे कमांड, पश्चिम लद्दाखच्या उंचावरील माउंटन विभाग, ईशान्येतील कॉअर, अंदमान आणि निकोबार कमांडचे (CIN-CAN) कमांडर-इन-चीफ आणि पूर्व कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ तसेच दक्षिण कमांडचे चीफ-ऑफ-स्टाफ आदी महत्वपूर्ण जबाबदाऱ्यांचा समावेश आहे.

ले. ज. पांडे यांच्या लष्करातील उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना अती विशिष्ट सेवा पदक, विशिष्ट सेवा पदक तसेच, लष्करप्रमुखांकडून आणि जीओसी-इन-सी ( GOC-in-C) कडून उत्तम कामगिरीसाठी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

# इम्पेरिकल डाटा गोळा करतांना कर्मचाऱ्यांची दमछाक

## ओबीसी आरक्षणाच्या अनुषंगाने माहितीचे संकलन: जिल्हा प्रशासनाने दिले निर्देश

**गोंदिया:** ओबीसी आरक्षणाच्या अनुषंगाने राज्य सरकारकडून विविध पातळीवर माहिती संकलित केली जात आहे. मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार १९६२ ते १९९४ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांची माहिती संकलित केली जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने सुद्धा ही माहिती संकलीत करण्याचे आदेश देत माहिती संकलनास सुरवात केली आहे.

### पुढाऱ्याची संख्या किती

| | |
|---|---|
| जिल्हा परिषद सदस्यांची सध्याची संख्या | ५३ |
| जिल्ह्यातील एकुण ग्रामपंचायती | ५४७ |
| एकुण सदस्य | ३८२९ |
| पंचायत समिती | ०८ |
| एकुण सदस्य | १०६ |
| नगरपंचायती | ०५ |
| नगरसेवक | ८५ |
| नगर परिषद | ०२ |
| नगरसेवक | ६२ |




१९६२ पासून आतापर्यंत झालेल्या जि.प., पं.स.आणि ग्रामपंचायत निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची माहिती तातडीने संकलित करुन मागितली आहे. ही माहिती संकलित करण्यासाठी प्रशासनाची चांगलीच दमछाक होत आहे.

लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या जि.प. सदस्य पं.स.सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्यांसह सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पदाधिकाऱ्यांची जातीनिहाय आरक्षणाची माहिती तातडीने राज्य निवडणूक आयोगाने मागितल्याने तालुका आणि जिल्हा प्रशासनाने जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांची माहिती उपलब्ध करण्यासाठी माहिती घेण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. ही माहिती जिल्ह्यातील बोटावर मोजक्ता इतक्या ग्रामपंचायतीकडे जुनी माहिती उपलब्ध आहे.जि.प.च्यावतीने १९७९ पर्यंतच्या माहितीचे संकलन करण्यात आले असून माहितीसाठी गावपातळीपर्यंत कर्मचारी पाठविण्याची वेळ आली आहे.ग्रामसेवकांनाही उमेदवाराची प्रवर्ग शोधण्यासाठी आटापिटा करावा लागत आहे.

### १९९९ मध्ये जिल्हा परिषदेची निर्मिती

भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन १९९९ मध्ये गोंदिया जिल्ह्याची स्थापना झाली तेव्हा गोंदिया जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली. एकुण ५३ सदस्यीय असलेल्या गोंदिया जिल्हा परिषदेच्या स्थापनेला २३ वर्ष पूर्ण झाली आहे.

### दीड हजारांवर नावांची माहिती संकलित

राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानंतर मागील १५ दिवसांपासून जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार १९६२ पासून निवडून आलेल्या पुढाऱ्यांची माहिती संकलित केली जात आहे. आतापर्यंत दीड हजारांवर पुढाऱ्यांची माहिती संकलित झाल्याची माहिती आहे. ही माहिती किचकट असल्याने आणि आधी जिल्ह्याचा समावेश भंडारा जिल्ह्यात असल्याने माहिती गोळा करताना कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे.

### अडचणी काय?

शासनाने १९६२ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांची माहिती संकलित करण्यास सांगितले आहे. मात्र बऱ्याच ग्रामपंचायतीकडे हा डाटाच उपलब्ध नाही. तेव्हा निवडून आलेले सदस्यांची जात, आरक्षण काय होते, लोकसंख्या किती होते, किती लोकसंख्येचा एक मतदारसंघ होता. किती ग्रामपंचायती होत्या ही सर्व बारीकसारीक माहिती मागवली आहे. त्यामुळे ती गोळा करताना कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे. ही माहिती संकलित करताना गावातील जुन्या जाणत्या पुढाऱ्यांना गाठून त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना फिरावे लागत असल्याचे चित्र आहे. त्यातही पुढारी वेळ देत नसल्याची माहिती आहे.

# पंचायत समिती सभापती आरक्षण जाहिर

**गोंदिया:** जिल्ह्यातील आठ पंचायत समिती सभापती पदासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरक्षण सोडत काढण्यात आली असून तीन ठिकाणी सर्वसाधारण, तीन ठिकाणी सर्वसाधारण महिला, एका ठिकाणी अनुसूचित जाती व एका ठिकाणी अनुसूचित जमाती महिला सभापती असे आरक्षण जाहिर झाले आहे. जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही आरक्षण सोडत काढण्यात आली. उपजिल्हाधिकारी (सामान्य) स्मिता बेलपत्रे,अधिकारी व विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

सभापती पदासाठी आरक्षण घोषित झालेल्या पंचायत समितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे. **गोंदिया** पंचायत समिती सभापती पद सर्वसाधारण, **आमगाव** सर्वसाधारण, **सालेकसा** अनुसूचित जाती, **गोरेगाव** सर्वसाधारण, **तिरोडा** सर्वसाधारण महिला, **सडक अर्जुनी** सर्वसाधारण महिला, **देवरी** सर्वसाधारण महिला व **अर्जुनी मोरगाव** अनुसूचित जमाती महिलासाठी राखीव असणार आहे. सभापती पदासाठीची ही सोडत ईश्वर चिठ्ठीद्वारे काढण्यात आली.

# आरटीओ चेकपोस्ट नाक्यावर पंटरांकडून वसुली

## विभागाच्या तिजोरीला चाट देऊन भरला जातो गल्ला

**देवरी:** उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील देवरी येथील सीमा तप-ासणी नाक्यावर करड्या नजरेतही साखळी पद्धतीने ओव्हरलोड व विना परवाना वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई न करता संबंधित मोटार वाहन निरीक्षकांनी रात्रदिवस आपापल्या पंटरांकडून सोयीस्कररित्या वसुलीचा गोरखधंदा मांडल्याची मोठी चर्चा आहे.




देवरी येथील छत्तीसगड सीमेवरील उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या सीमा तपासणी नाक्यावर मोटार वाहन निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रशासनानेच या स्थिर सर्व्हेक्षण पथकाच्या करड्या नजरेवर झापडी बसवून बेकायदेशीर वसुली केली असल्याची चर्चा सध्या जोमात सुरु आहे.

सीमा तपासणी नाक्यावर एकीकडे नियुक्त अधिकारी वाहनांची कसून तपासणी करुन चौकशी करीत असताना दुसरीकडे उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या मोटार वाहन निरीक्षकांची खासगी पंटर मोटार वाहनाच्या सहा, दहा, बारा वा चौदा चाकी वाहनांच्या ओव्हरलोडची अवैध वसुली होत असल्याची गंभीर बाब झोपी गेलेल्या शासनाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी असल्याची टीका जनसामन्यांकडून होत आहे. क्षमतेपेक्षा जास्त भार असलेल्या व नियमीतपणे या सीमा तपासणी नाक्यावरुन ये-जा करणाऱ्या ठरावीक ट्रान्सपोर्टच्या अवजड वाहनांची या उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या नाक्यावरील अधिकाऱ्यांशी साखळी पद्धतीने अवैध वसुलीची नाळ जुळली असल्याचा भंडाफोड यापुर्वी अनेकदा झाला.

कथित कार्डधारकांना कितीही ओव्हरलो-ड असला तरी उपप्रादेशिक परिवहन विभागाची दंडात्मक पावती न फाडता वैयक्तिकरित्या संबंधित मोटार वाहन निरीक्षकांची ठरलेली रक्कम पंटरांकडून वसुली करण्याचा गोरखधंदा सुरु असल्याची ती बाब अव्याहतपणे सुरु आहे.

# शिक्षक संघटनांना नकोय जिल्हा नक्षलमुक्तीची वाटचाल

## गोंदिया,चंद्रपूर जिल्हे नक्षलमुक्तीच्या वाटेवर, राज्यात फक्त १९ तालुक्यातच नक्षल कारवाया, गृहमंत्रालयाचा अहवाल

**गोंदिया:-** पूर्व विदर्भातील गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यात माओवाद्यांच्या प्रभाव क्षेत्रात मोठी घट झाल्याचा प्रस्ताव राज्याच्या पोलिस महासंचालकांनी दिला आहे. यावर आक्षेपांसाठी सात दिवसांची मुदत दिली आहे. यानंतर हा प्रस्ताव राज्य सरकारकडून पारित केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रस्तावामुळे आता केवळ गडचिरोली हा एकमेव संपूर्ण जिल्हा माओवादग्रस्त उरला आहे.

मात्र गोंदिया जिल्ह्यातील चार तालुके नक्षलग्रस्त यादीतून वगळण्यात आल्याचे कळताच गोंदिया जिल्ह्यातील सर्वच शिक्षक संघटनांनी संपूर्ण जिल्हाच नक्षलग्रस्त कायम रहावा यासाठी राजकीय नेत्याकडे धाव घेतली. त्यातही खासदार, आमदारांनीही जिल्हा नक्षलग्रस्त कायम ठेवण्याचे आश्वासन या संघटनांना दिले. वास्तविक जिल्ह्यातील बहुतांश भागात नक्षल कारवायाच काय घडामोडी सुद्धा नाहीत. मात्र नक्षलग्रस्तच्या नावावर मिळणारी वेतनवाढ कमी होणार हे लक्षात येताच जिल्हा विकासाचे नाव पुढे करुन शिक्षक संघटनांनी जिल्हा नक्षलग्रस्त कायम रहावा ही केलेली मागणी म्हणजे शिक्षकांनाच जिल्हा नक्षलमुक्त नकोय? असे चित्र झाले आहे. विशेष म्हणजे शिक्षकांच्या संघटना व्यतिरिक्त इतर



कुठल्याही कर्मचारी संघटनेने यासाठी निवेदन देण्याची घाई केलेली नाही. मात्र शैक्षणिक कामाकडे कमी आणि राजकीय स्वरूपच या संघटनांनी धारण केल्याचे चित्र समोर आले आहे.

त्यासंबंधीचा आदेश गृहविभागाचे उपसचिव संजय खेडेकर यांच्या स्वाक्षरीने १३ एप्रिल २०२२ रोजी जारी करण्यात आला.इतर तालुके वगळल्याने तेथील हजारो शासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक धक्का बसला आहे. यापुढे त्यांना एकस्तर वेतनश्रेणी आणि दरमहा दीड हजार रुपयांच्या भत्त्याला मुकावे लागणार आहे

माओवादी कारवायांचा वेळोवेळी अभ्यास करून प्रभावित तालुक्यांच्या संख्येबाबतचा निर्णय राज्य सरकारकडून घेतला जा-तो. जानेवारी महिन्यात आढावा घेऊन आवश्यकतेनुसार त्यात बदल करण्याचा प्रस्ताव पोलिस महासंचालकांकडून सादर करण्यात येतो. यंदा माओवादग्रस्त भाग जाहीर करण्याबाबतचा २०२२ साठीचा प्रस्ताव पोलिस महासंचालकांनी सादर केला आहे. यात विदर्भातील गडचिरोली जिल्हा, गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा, देवरी, अर्जुनी-मोरगाव, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, कोरपना व जिवती हे तालुके माओवादग्रस्त दर्शविण्यात आले आहेत.

शासनाच्या ७ डिसेंबर २००४ व २० मे २००५च्या निर्णयानुसार गडचिरोली आणि गोंदिया हे दोन्ही जिल्हे संपूर्ण तर चंद्रपूर जिल्ह्या-तील नऊ तालुके माओवादग्रस्त यादीत होते. भंडारा, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यात पाच वर्षांत एकही माओवाद्यांसंदर्भात गुन्हा दाखल झाला नाही. त्यामुळे या जिल्ह्यांना वगळण्यात आले. या भागात कुठल्याही स्वरुपाच्या माओवादी कारवाया नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. सुमारे २२ तालुके माओवादग्रस्त तालुक्यांच्या यादीतून वगळण्यात आले होते. आता गृहमंत्रालयाने केवळ गडचिरोली हा एकमेव संपूर्ण जिल्हा माओवादग्रस्त असल्याचे स्पष्ट केले आहे.

### समावेशाने काय होते?

माओवादग्रस्त जिल्ह्यांमध्ये माओवादी आणि पोलिस यांच्यातील संघर्षाचा परिणाम स्थानिक जनतेवर होत असतो. या परिसरात राबविल्या जाणाऱ्या सरकारी योजनांवरही या सर्व कारवायांचा परिणाम होत असतो. हे सर्व प्रकार रोखण्यासाठी, जनतेला दिलासा देण्यासाठी परिसरात सरकार विशेष योजना राबविते. पोलिस संरक्षणात वाढ करते. राज्य सरकार वेगळा निधीही खर्च करीत असते.

### गोंदियाऐवजी हवे सडक-अर्जुनीचे नाव

माओवादग्रस्त भागात सेवा देणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना दरमहा १ हजार ५०० रुपये प्रोत्साहनपर भत्ता आणि एकस्तर वेतनश्रेणी दिली जाते. याचा दर दोन वर्षांनी हा आढावा घेतला जातो. गोंदिया जिल्ह्या-तील सडक-अर्जुनी तालुक्यात माओवादी हालचाली असतानाही या तालुक्याला वगळण्यात आल्याने चर्चा वाढल्या आहेत.वास्तविक गोंदियाऐवजी सडक अर्जुनीचा समावेश असायला हवा होता.

### अहवालात काय?

गडचिरोली : संपूर्ण जिल्हा

गोंदिया : देवरी, सालेकसा, अर्जुनी-मोरगाव, गोंदिया

चंद्रपूर : राजुरा, कोरपना, जिवती

गोंदिया जिल्हा मुळात नक्षलग्रस्त नाहीच. पण नक्षल संघटनेचे "रेस्ट झोन" म्हणजे विश्रांती स्थळ नक्कीच आहे. विश्रांती काळात काही अप्रिय घटना देवरी व सालेकसा तालुक्यात घडत असतात.त्यामुळे संपूर्ण गोंदिया जिल्हा नक्षलग्रस्त ठरविणे चुकिचे आहे.देवरी व सालेकसा तालुक्यातील नक्षलग्रस्त भत्ता पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांना मिळायला हरकत नसावी. पण सरसकट जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना मिळायला नको. कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी हे आर्थिक लाभापोटी अशा मागण्या लावुन धरतात.व शासनाचा फार मोठा आर्थिक तोटा होतो, हे सुजान कर्मचाऱ्यांकडून मागणी होते हे बुद्धीदारिद्राचे लक्षण आहे.-**भुपेन्द्र मस्के** शिरपुर (चिचगड)

गोंदिया जिल्ह्यासमोर नक्षलग्रस्त जिल्हा लागलेले नाव नक्कीच हटायला हवे,काही थोड्याफार आर्थिक सवलतींसाठी जिल्ह्याची ओळख जाणीवपुर्वक नक्षलग्रस्त करणे चुकीचे आहे.तसेच नक्षलप्रभावीत भागात कार्यरत अधिकारी कर्मचारी यांनाही सुरक्षा देणे तेवढेच महत्वाचे आहे.सध्याच्या घडीला ५० टक्केपेक्षा अधिक भाग हा नक्षलग्रस्त नाही.

**सौरभ अग्रवाल** (शासकीय कर्मचारी)

गोंदिया जिल्ह्याच्या इतिहास बघितल्यास जिल्ह्यात नक्षल कधीच प्रभावी राहिलेले नाहीत.त्यांनी छत्तीसडमधून मध्यप्रदेशात ये जा करतांना किंवा शेजारील जिल्हयात काही घडामोडी झाल्यानंतर या जिल्ह्याचा एक विश्रांतीस्थळ म्हणून वापर केला आहे.सुरवातील काही घटना घडल्या त्या नाकारता येत नाही,मात्र सध्याच्या घडीला जिल्हा नक्षलग्रस्त नाहीच.नक्षल्यांनी आपल्या विश्रातीस्थळासाठीच या जिल्ह्यात दोनचार मोठ्या घटना करुन सीमावती भागावर आपले बस्तान मांडले,ते रेस्टझोन म्हणूनच. त्यामुळे जिल्ह्याला नक्षलग्रस्त हे ला-गलेले बिरुद कायम टिकवून ठेवण्यासाठी जी धडपड काही संघटना करतायेत ते योग्य नसून जिल्हा नक्षलग्रस्ताच्या यादीतून मुक्त व्हायला हवे. आर्थिक लाभ मिळतात म्हणून नक्षलग्रस्तभागाव्यतिरिक्त इतर भागालाही नक्षलग्रस्त जाहीर करण्याच्या मागणीबद्दल किव येऊ लागली आहे.-

**संजय राऊत** पत्रकार

गोंदिया जिल्ह्यात आत्ता सुरवातीसारख्या नक्षलकारवाया नाहीत,काही व्यक्ती नक्षल्यांना साहित्य पुरविण्याच्या नावावर पकडले जात आहेत, हे सत्य असले तरी घटनात्मक कारवाया नसल्याने जिल्हा नक्षलग्रस्त यादीतून नक्कीच बाहेर पडायला पाहिजे.सोबतच सीमावर्ती भागात पोलिसांच्या बंदोबस्तात वाढ होण आवश्यक असून आदिवासी जनतेसोबत सौहार्दाचे संबध तयार करुन त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.पोलीस आणि नक्षल्यांच्या वादात सर्वसामान्य जनता भरडली जाऊ नये.वास्तविक नक्षलग्रस्त भागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नक्षलभत्ता देण्यास काहीही अडचण नको.

**विजय ढोमणे**(सेवानिवृत्त अभियंता)

नक्षलग्रस्त भागाकरिता पोलीस विभागाद्वारे जे संवेदनशील क्षेत्र निवडले आहे. त्याच भागामध्ये नक्षलग्रस्त भत्ता लागू व्हावे संपूर्ण जिल्ह्यात नक्षलग्रस्त भत्ता देण्याचे काही कारण नाही.अन्यथा गोंदियाच्या शिक्षक आणि ककोडी क्षेत्रातील लेंडीजोब ,महाका या गावी काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये काहीही फरक राहणार नाही. तालुक्याचा विचार केल्यास मोरगाव अर्जुनी, सडक अर्जुनी, देवरी ,सालेकसा या भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना नक्षलग्रस्त भत्ता देण्यात यावे संपूर्ण जिल्ह्यात नक्षलग्रस्त भत्ता देऊ नये. ज्या भागामध्ये नक्षलवादी कारवाया होत नाही त्या भागातील कर्मचाऱ्यांना किंवा त्या भागाला नक्षल एरिया म्हणून समजण्यात येऊ नये.नाहीतर संपूर्ण दे-शालाच नक्षल ग्रस्त देश म्हणून ओळखण्यात यावा.

**लोकनाथ तितराम** (शिक्षक)

आतापर्यंत केंद्रशासन आणि राज्य शासनाचा मूळ उद्देश हा नक्षलवादाचा पूर्णत: नायनाट करणे हाच राहिला आहे आणि त्या अनुषंगाने जर गृहविभागाने गोंदिया जिल्ह्या-तील काही तालुके ज्यात नक्षल कार्यवाही गेल्याकाही वर्षात आढळून आली नाही अश्या तालुक्याना यादीतुन वगळण्यात आले ही खरच स्वागतार्ह बाब आहे.पण गृह विभागाने गाफील न राहता नक्षल कार्यवाह्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.-**योगेश कडव**

## संपादकीय

### दिशाहीन नेतृत्वामुळे एसटी संप चिघळला!

गेल्या ६०-६५ वर्षांपासून राज्यातील जनतेला दळणवळणाच्या दृष्टीने "लालपरी' चा मोठा आधार राहिला आहे आणि त्यासाठी एसटी च्या कर्मचाऱ्यांचे नेहमीच मोठे योगदान राहिलेले आहे. मात्र एसटी कर्मचारी हे शासकीय नोकर नसल्याने त्यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ना वेतन, भत्ते मिळतात ना निवृत्ती नंतरचे लाभ मिळतात. त्या मुळे अतिशय तुटपुंज्या पगारात आयुष्यभर जनतेची सेवा करायची आणि नाममात्र निवृत्ती वेतनावर जगण्यात वृद्धापकाळातील जिवन जगायचे. वर्षानुवर्षे कोणीही या प्रश्नावर गांभीर्याने लक्ष दिले नाही म्हणूनच अखेर गेल्या पाच महिन्यांपासून हजारो एसटी कर्मचारी दुखवटा आंदोलन करीत होते.

विशेष म्हणजे आजवर राजकीय व्यवस्था, कामगारांच्या संघटना यांच्या कडून भ्रमनिरास झाल्याने सगळेच कामगार एक होऊन लढत होते. मात्र यात राजकारण शिरले आणि आंदोलन भरकटले. राज्य सरकारने बहुतेक मागण्या मान्य केल्या मात्र विलिनीकरणाशिवाय काहीच मान्य नाही अशी हटवादी भुमिका कर्मचाऱ्यांनी घेतली वास्तविक मागणी काही गैर नव्हती. मात्र विलिनीकरण हे सहजासहजी आणि तातडीने शक्य नाही म्हणूनच न्यायालयाने समिती नेमली. समितीच्या अहवालानंतर विलिनीकरण होणे नाही हे स्पष्ट झाले होते, आंदोलन संपणार असे वाटत होते, मात्र अनपेक्षितपणे न्यायालयात कर्मचाऱ्यांची कायदेशीर बाजु लढणाऱ्या वकिल महाशयांनी आंदोलनाचे नेतृत्व हाती घेतले आणि एकुणच आंदोलन भरकटत गेले.

सुरवातीला कर्मचाऱ्यांबाबत जनतेची असलेली सहानुभूती देखील कमी होत चालली. जवळपास सर्वच श्रेत्रात कर्मचारी वर्गावर अन्याय होतो तो मुख्यतः राजकीय उदासिनता, ईच्छाशक्ती नसल्याने. सर्व पक्षीय राज्यकर्त्यांनी आपली फसवणूक केल्याची भावना कर्मचाऱ्यांची झाली होती आणि ते काही चुकिचे नाही. या काळात जवळपास १५० कर्मचाऱ्यांचे दुर्दैवी मृत्यू झाले. राज्य सरकारने हे आंदोलन व्यवस्थितपणे हाताळले नाही तर विरोधी पक्षाने राजकारणा पलिकडे काही केले नाही. वास्तविक विलिनीकरण होऊच शकत नाही असे नाही, ईच्छाशक्ती आणि मानसिकता असेल तर सगळे काही होऊ शकते. विधिमंडळ, संसद हे सर्वोच्च आहेत. मात्र या सगळ्यात सामान्य जनता तर वेठीस धरली गेली आणि कर्मचाऱ्यांचे सर्वतोपरी नुकतसानच झाले. राज्यकर्ते आणि विविध कामगार संघटना यांनी देखील भविष्यात कर्मचाऱ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करायला हवे. झालं ते झालं आता सगळ्यांनी मिळून आपल्या फलालपरीफला बळ द्यायला हवे,त्यातूनच गाव तेथे रस्ता आणि रस्ता तेथे एसटी धावेल आणि बहुजन हिताय बहुजन सुखायफ्हे ब्रिद वाक्य एसटी ला शोभुन दिसेल.

वर्षानुवर्षे तोट्यात असलेल्या एसटीला काहीअंशी उत्पन्न मिळेल, अशा ऐन दिवाळी सणाच्या मुहूर्तावर एसटी कर्मचारी संघटनांनी विलीनीकरण, सातवा वेतन आयोग व इतर मागण्यांसाठी संप पुकारला. विलीनीकरण सोडून एसटी कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्यांना राज्य शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत गेला. भविष्यात सातव्या आयोगाप्रमाणे वेतनही दिले जाईल, कर्मचाऱ्यांना चार वर्षे नियमित वेतन मिळावे म्हणून अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली गेली. कोरोना काळात कामगिरी बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना ३०० रूपये भत्ता दिला जात होता. या काळात मृत्युमुखी पडलेल्या १० कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख, तर ९१ कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख देण्यात आले होते. कर्मचाऱ्यांनी कामावर हजर व्हावे, त्यांच्यावर कारवाई केली जाणार नाही म्हणून पाच महिन्यात राज्यसरकार व न्यायालयाकडून आदेश येत होते. पण राज्यातील ६५ लाख प्रवाशांचा विचार न करता प्रवाशांना वेठीस धरल्याचे भान नसल्यागत त्यातच सरकार विरोधी म्हटल्यानंतर प्रवाशांचा विचार न करता भाजपचे काही आमदार एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठींबा देत आझाद मैदानावर ठाण मांडून होते.

राज्य सरकार व व न्यायालयाचे आदेश वारंवार धुडकावत कर्मचारी संघटनांनी संप सुरुच ठेवला. कर्मचारी संघटनांचे दिशाहीन नेतृत्व, विरोधी पक्षाचा जनतेचा विचार न करता एकतर्फी पाठिंबा आणि न्यायालयाचा आदेश धुडकावण्याची वकीलांसह सर्वांचीच वृत्ती व एकूण नेतृत्वाचा प्रसिद्धीचा हव्यास, ताठर भूमिका आणि संघटनांमध्ये नस-लेली एकवाक्यता.. यामुळे संप अकारण पाच महिने लांबला. शेवटी न्यायालयाने विलीनीकरण तर नाहीच पण सरकारने कर्मचाऱ्यांवर कारवाई नको असा निकाल देत एसटी कर्मचाऱ्यांनी कामावर रूजू व्हावे, अन्यथा त्यांना नोकरीची गरज नाही समजून सरकारने आपल्यापरीने निर्णय घ्यावा, असे म्हटले. न्यायालयाच्या या निर्णयावर हा संप मिटला. जणूकाही या संपातून शेवटी बरेच काही प्राप्त केले, अशा अर्थाने जल्लोष झाला. खरे तर राज्य सरकारने पूर्वी जे मान्य केले, त्यापेक्षा वेगळे काही या निर्णयात नव्हतेच. या संपात कर्मचाऱ्यांच्या रजा गेल्या, पगार गेला, कर्ज असेल तर त्यांचे हप्ते रखडले, नोकरीतील ग्रॅच्युईटीवर परिणाम झाला. नोकरीतील रेकॉर्डवर शेरा हे भोगावे ला-गलेच, पण एसटीवर अवलंबून असणाऱ्या प्रवाशांना दिशाहीन केले, एसटीने शाळा कॉलेजात जाणा-या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे अत-ोनात शैक्षणिक नुकसान झाले ते कसे भरून निघणार? खासगी वाहतूक सेवा देणाऱ्यांनी या संप कळात लोकांना अक्षरश: लुबाडले. त्यातून, आम्ही एसटीवर अवलंबून नाही, ही एसटी प्रवाशांची मानसिकता दृढ झाली आणि एसटी कर्मचाऱ्यांनी वर्षानुवर्षे एसटीशी संबंध असणाऱ्या प्रवाशांचा विश्वास गमावला. आणखी एक प्रश्न उपस्थित होतो की, न्यायालयाच्या निर्णयानंतर एसटी कामगार खूष होऊन जल्लोष करतात आणि त्याचवेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांच्या घरावर ॲड. सदावर्तेसह शंभरहून अधिक एसटी कर्मचारी ठरवून हल्ला करतात. त्याचा अर्थ काय समजावा? या कर्मचाऱ्यांना अटक झाल्यानंतरही भाजपचे राज्यातील नेते म्हणतात, आम्ही एसटी कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहोत. मतदारांनीच या वक्तव्याचा अर्थ शोधावा.

एसटी संपाचे फलित काय हा खरेतर मोठा प्रश्न आहे. अव्यवहार्य मागण्यांमुळे चिघळत गेलेला हा संप अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा ठरला आहे. एसटी कर्मचाऱ्यांची शासनामध्ये विलीनीकरणाची मागणी अनेक वर्षांपासूनची असून सध्याची परिस्थिती पाहता ती पूर्ण करणे अशक्यच आहे ही बाब सर्वपक्षीय राजकर्त्यांना ठाऊक आहे. राज्य शासनाच्या अखत्यारीतील असंख्य महामंडळेदेखील अशीच मागणी करण्याची शक्यता पाहता शासकीय तिजोरी हा भार उचलण्यास सक्षम नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी ठराविक काळापुरते या संपाचे समर्थन केले. त्यात शासनाकडून वेतनवाढीसारखी महत्वाची मागणी पदरात पाडून घेतल्यावर तरी संप मिटायला हवा होता. मात्र त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांनी स्वीकारलेले नेतृत्व अक्षरशः दिशाभूल करणारे ठरले. तब्बल पाच महिन्यांपासून सुरूअसलेल्या आंदोलनाने महामंडळाचे कंबरडे तर मोडलेच पण पगार नसल्याने हजारो कर्मचाऱ्यांची कुटुंबदेखील आर्थिक विवंचनेत आली. एसटीवर अवलंबून अनेक घटक आज एसटी बंद असल्याने प्रचंड त्रासामध्ये आहेत.

चुकीच्या नेतृत्वाचा अतिरेक तेव्हा झाला जेव्हा या संपाशी थेट संबंध नसलेल्या राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते शरद पवार यांच्या घरावर हल्ला करण्यापर्यंत नियोजन केले गेले. याने शंभराच्या वर कर्मचाऱ्यांवर गुन्हे नोंदवून त्यांना जेलमध्ये पाठवण्यात आहे. कायद्याचे राज्य असलेल्या कुठल्याही भागात हे होणारच होते. त्यामुळे आतातरी एसटी कर्मचाऱ्यांनी आपले हित लक्षात घेऊन एसटीला पुन्हा एकदा पूर्ण क्षमतेने लोकांच्या सेवेत आणावे. एसटी महामंडळालादेखील अधिक काळ ही सेवा नुकसान सहन करून चालवणे परवडणारे नाही. याने उद्या एसटीचे खासगीकरण झाले वा एसटी बंद पडली तर कर्मचारी व प्रवाशांचे काय होईल याचा विचार करायला हवा.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०९५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शरद पवारांच्या घरावरील हल्ला आणि 'टायगर अभी जिंदा है!'

एसटी संपाच्या बाबतीत न्यायालयाने आदेश दिल्यानंतर आधी जल्लोष केला जातो आणि नंतर त्याच टोळीकडून शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याच्या घरावर अचानक खुनी हमला केला जातो, दगडफेक केली जाते, जोडे चपला फेकल्या जातात, अत्यंत गलिच्छ अशी शिवीगाळ केली जाते, हा सारा प्रकारच संतापजनक आहे. त्याचा केवळ शाब्दिक निषेध करून चालणार नाही. तर असल्या प्रवृत्तीला ठेचून काढले पाहिजे. तीच आजच्या काळाची गरज आहे. अशावेळी कुणाचाही मुलाहिजा ठेवता कामा नये. अर्थात ह्या हल्ल्यामागे कोणती प्रवृत्ती आणि कोणते मानसिक रुग्ण आहेत, हे सांगण्याची गरज नाही. वकिलाच्या काळ्या कोटातील एक माकड एवढा सारा हैदोस घालण्याची हिम्मत कशी काय करू शकते? शरद पवारांसारख्या नेत्याच्या घरावर डायरेक्ट हिंसक हमला करण्याची हिम्मत यांच्यात कुठून येते? याच्यामागे गेल्या ७/८ वर्षात देशातील राजकारणाला जे अतिरेकी ग्रहण लागलं आहे, त्याचा हा परिणाम आहे. खुद्द आतंकवादी जेव्हा खासदार म्हणून राजकीय पक्षातर्फे संसदेत पाठवले जातात, तेव्हा गल्लीबोळातल्या गुंडांना देखील नवा आत्मविश्वास प्राप्त होत असेल तर त्यात नवल नाही. आपणही देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री, मुख्यमंत्री होऊ शकतो, किमान विरोधी पक्षनेते सहज होऊ शकतो, अशी महत्त्वाकांक्षा निर्माण होणे स्वाभाविक आहे. कशा कशा बाया, कशी कशी माणसं, असल्या राजकीय पक्षानं जाणीवपूर्वक वाढवले आहेत, पैशाच्या जोरावर मीडियाला हाताशी धरून प्रमोट केले आहेत, हे बघून संताप येतो. किळस येते. थेट कोठ्यावर बसून धंदा करणारे लोक जेव्हा सभ्य समाजाच्या चारित्र्याची ऐशीतैशी करतात आणि तरीही समाज चूप राहतो, तेव्हा एका मोठ्या अराजकाची सुरुवात झालेली आहे, असे समजायला हरकत नाही.

भारतीय राजकारण एवढ्या खालच्या पातळीवर कधीच गेले नव्हते. सत्तेसाठी किंवा सत्ता गेल्यामुळे सहकुटुंब पिसाळणाऱ्या लोकांची संख्या महाराष्ट्रात दिवसेंदिवस वाढताना दिसते. कुठलीही मानमर्यादा या लोकांनी ठेवलेली नाही. विरोधी पक्षांच्या नेत्याबद्दल हे लोक ज्या प्रकारची भाषा वापरतात त्यावरुन यांचा जन्म एखाद्या गटारात किंवा उकिरड्यावर झाला असावा की काय अशी शंका येते! अर्थात





त्यांच्या पक्षातील इतर सर्वांना हे आवडते आहे, असाही त्याचा अर्थ नाही. त्यातील बरेच लोक अस्वस्थ आहेत. आतल्या आत संतापलेले आहेत, चिडलेले आहेत! पण विरोधी पक्षच जिथे शेपट्या टाकून बसला आहे, तिथे ते तरी बिचारे काय करणार ? ही खंत अनेक लोकांच्या बोलण्यातून सतत जाणवत राहते. त्यातील एक मोठा वर्ग हतबल झालेला आहे, असे दिसते.

'टायगर अभी जिंदा है' हा डायलॉग पुन्हा पुन्हा वापरत होते. २/३ महिन्यापूर्वीच त्यांनी मला भेटायची इच्छा व्यक्त केली होती. माझा पता विचारत होते. पण त्यांचं वय समजताच मी स्वतःच भेटायला येतो, असे मी त्यांना बोललो. परवा त्यांना भेटायला जाण्याचा योग आला. ह्या व्यक्तीचे वय नव्वदीच्या पुढे. विचारधारा काँग्रेसविरोधी. पण त्यांच्या आवडीच्या पक्षातील काही लोकांच्या आगाऊपणामुळे ते वैतागले होते. अलीकडे जो काही गोंधळ सुरू आहे, तो त्यांना बिलकुल पसंत नव्हता. पण त्यांच्या बोलण्यातील एका वाक्यामुळे मी चमकलो. 'हे लोक देशाचे तर नुकसान करतच आहेत, पण स्वतःच्या पुढच्या पिढ्यांचेही भविष्य बर्बाद करत आहेत' अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. मलाही धक्का बसला. म्हणजे विकृतीने किती खोलवर हातपाय पसरले, याची जाणीव आता सर्वव्यापी होत असल्याचे मला जाणवले. 'एका गोडसेने केलेल्या चुकीची किंमत आम्ही आजपर्यंत मोजत आलो आहोत. पुन्हा दुसरी चूक आम्हाला परवडणारी नाही' असं नितीन गडकरी मागे एकदा बोलले होते, त्याची आठवण मला याक्षणी प्रकर्षाने झाली.

विशेष म्हणजे नव्वदी पार केलेल्या ह्या ज्येष्ठ व्यक्तीमध्ये जगण्याची प्रचंड ऊर्जा होती. वाचन होते. उत्साह होता. समाजाची चिंता होती आणि विवेक जागा होता. त्यांच्या घरी गेल्या गेल्याच पाच आकडी रकमेचा एक वजनदार चेक त्यांनी माझ्या हातात ठेवला. हा माझ्यासाठी आश्चर्याचा धक्का होता. तुमची चळवळ अखंड चालू राहावी, यासाठी ही माझी छोटीसी भेट म्हणून ठेवून घ्या, असं अगदी सहजतेने म्हणाले. आणि 'टायगर अभी जिंदा है' म्हणून अभिमानाने मूठ आवळून अभिवादन केले.

मला नक्की खात्री आहे, की शरद पवार यांच्याशी वैचारिक मतभेद असतील तरीही, अशा समंजस आणि बुजुर्ग लोकांना शरद पवारांच्या घरावरील हल्ल्यामुळे नक्कीच वेदना झाली असेल. असले हिंसक आणि गलिच्छ राजकारण पसंत नसणारा एक मोठा वर्ग भाजपामध्ये देखील आहे. सध्या तो चूप आहे. मजबूर आहे एवढंच ! घरावर हमला झाला असताना, हिंसक टोळीला सामोरं जाण्याची हिंमत ज्या तऱ्हेने खासदार सुप्रिया सुळे यांनी दाखवली, ते सुद्धा 'काबिले तारीफ' आहे! त्यासाठी जिगर लागते ! भुरटे राजकारण करणाऱ्या लोकांच्या आवाक्यातील ही गोष्ट नाही! अन्यथा एवढी मोठी सिक्युरिटी असूनही 'आपके सिएम को बता देना, मै जिंदा लौटकर आया हूं' असली अत्यंत छछोर भाषा वापरणारेही देशाने पाहिले आहेत आणि त्यांच्या बिनडोक भक्तांची संख्याही काही कमी नाही.

सत्तेचे चार पेग अनपेक्षितपणे पोटात गेल्यामुळे उधाणलेली माकडं अलीकडे बेभान झालेली आहेत. बागेची धूळधाण करायला निघाली आहेत. हवा तसा नंगा नाच करू लागली आहेत. साऱ्या बागा, सारी जंगलं आपल्या बापाच्या मालकीची आहेत, अशा भ्रमात वाटेल तशा उड्या मारत आहेत. त्या सर्व माकडांनी एकच लक्ष्यात ठेवायला हवं, की वेगवेगळ्या जंगलातील अनेक वाघ अजूनही जिवंत आहेत ! टायगर अभी जिंदा है! तेव्हा माकडांनी वेळीच शहाणं झालेलं बरं ! त्यातच त्यांचंही भलं आहे, देशाचंही भलं आहे आणि त्यांच्या पुढच्या पिढ्यांचंही भलं आहे ! निदान आपल्या पुढच्या पिढ्यांचा तरी विचार करायलाच हवा ! तूर्तास एवढंच..

**ज्ञानेश वाकुडकर**
अध्यक्ष लोकजागर
९८२२२७८९८८

## उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**गोंदिया:** जिल्ह्यातील विविध शासकीय विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा राज्यमंत्री नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र




राज्य तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सत्कार करण्यात आला. जिल्हा आढावा बैठकीत हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

आमदार मनोहर चंद्रिकापूरे, जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पो-लीस अधीक्षक विश्व पानसरे, उपवनसंरक्षक कुलराज सिंह, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. निवडणूक विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचे योग्य विनियोजन करणाऱ्या जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, भूमी अभिलेख्याचे संगणकीकरण करण्यात पुढाकार घेणाऱ्या जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी रोहिणी सागरे, जिल्हा खनिकर्म अधिकारी सचिन वाढवे, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, माविम जिल्हा व्यवस्थापक संजय संगेकर, जिल्हा सांख्यिकी अधिकारी रुपेशकुमार राऊत, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी धनंजय देशमुख, मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण, तहसीलदार नरसय्या कोंडागुर्ले, उपअभियंता संजय कटरे, सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी अनिराम मरसकोल्हे, सांख्यिकी सहाय्यक निकलेश दडमल, संदीप पवार, अंकीतकुमार अग्रवाल, प्रशांत टेंभूरकर, नरेश वानखेडे व अव्वल कारकून धोंडीराम कातकडे यांचा यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## टॅब,इंटरनेट डेटा नाही, तरी ऑनलाईन प्रशिक्षण!; महाज्योतीचा अजब कारभार

**नागपूर** : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) ने खासगी शिकवणीमार्फत आयआयटी, जेईई आणि नीटचे ऑनलाईन प्रशिक्षण चार महिन्यांपूर्वी सुरू केले. मात्र, त्यासाठी आवश्यक टॅब, इंटरनेट डेटा आणि पुस्तके विद्यार्थ्यांना मिळालीच नाहीत. यामुळे १२ हजार विद्यार्थी प्रशिक्षणापासून वंचित असून महाज्योतीच्या या अजब कारभारामुळे योजनेच्या उद्देशाला हरताळ फासला जात आहे.

महाज्योतीने ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसीमधील आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि होतकरू विद्यार्थ्यांना आयआयटी,



जेईई आणि नीट परीक्षेच्या तयारीचे ऑनलाईन प्रशिक्षण ७ डिसेंबर २०२१ पासून सुरू केले. शहरी भागातील ७० टक्के आणि ग्रामीण भागातील ६० टक्के गुण प्राप्त करणाऱ्या आणि ११ व्या वर्गात विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण नि:शुल्क आहे. यासाठी ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले होते. त्यानुसार राज्यातील १२ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले. ऑनलाईन प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना टॅब, दरदिवशी सहा जीबी डेटा आणि पुस्तके नि:शुल्क दिली जाईल, असे महाज्योतीने जाहीर केले होते. परंतु वर्ग सुरू होऊन चार महिने लोटल्यानंतरही विद्यार्थ्यांना टॅब आणि पुस्तके मिळालीच नाहीत. यामुळे ऑनलाईन प्रशिक्षण कसे घ्यायचे आणि अभ्यास कसा करायचा, असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे. महाज्योतीच्या अजब कारभारामुळे सुमारे २० ते २५ कोटी रुपये खर्चातून राबवल्या जाणाऱ्या या योजनेचा उद्देश पूर्णत: फसल्याचे चित्र आहे. प्रशिक्षणाचा कालावधी संपल्यानंतर टॅब आणि पुस्तके देऊन काय उपयोग, असा सवाल विद्यार्थी करीत आहेत.

### १२ हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

आयआयटी, जेईई, नीट या पात्रता परीक्षांच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी राज्यभरातील १२ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ऑनलाईन प्रशिक्षण सुरू होऊन चार महिने लोटल्यानंतरही आवश्यक साहित्य न मिळाल्यामुळे १२ हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. कोटयवधींचा खर्च करूनही मुख्य हेतू साध्य होत नसेल तर प्रशिक्षणाचा काय उपयोग, असा सवाल "स्टुडंटस राईटस असोसिएशन ऑफ इंडिया'चे अध्यक्ष उमेश कोराम यांनी केला आहे.

## ओबीसी युवा अधिकार मंचची स्थापना

**नागपूर:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त नागपूर येथे ओबीसी युवा अधिकार मंच या संघटनेची स्थापना करण्यात आली. जास्तीत-जास्त ओबीसी युवकांनी या संघटनेत सामील व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या संघटनेचा मुख्य उद्देश ओबीसी जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरणे, ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ण स्थापित करणे, प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी आणि मुलांसाठी स्वतंत्र असे ७२ वसतीगृह या वर्षांपासून सुरु करणे. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज योग्य रितीने करणे, मागील अडीच वर्षांपासून युवकांना रोजगारांसाठी कर्ज उपलब्ध झाले नाही. कर्ज मिळवण्यासाठी प्रक्रिया सुलभ करण्याची लावून धरणे, तसेच सध्या ओबीसी विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्तीची संख्या १० आहे ती वाढवून १०० करणे आहे. याशिवाय इतर विषयांसाठी




ओबीसी युवा अधिकार मंच कार्य करणार आहे. संविधान चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केल्यानंतर या मंचच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली. यावेळी निकेश पिने, पीयुष आकरे, कृतल आकरे, उमेश कोर्राम, अनुप खडकर, मनीष गिरडकर, पार्थ मिरे, ओम आरेकर उपस्थित होते.

## बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार

सत्याचे, समर्पण भावाचे, दूरदृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, मानवता-वादी नवविचारांचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे आणि सर्व समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित करणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य म्हणजे भारताच्या इतिहासातील गौरवशाली पर्व आहे.

भारतीय अस्मितेचे हे प्रतीक आहे. उपेक्षित समाजासाठी त्यांनी अभूतपूर्व योगदान दिले आहे. उपेक्षित, वंचित आणि महिलांनाही सामाजिक समतेचे समान हक्क आणि अधिकार मिळायलाच हवेत, यासाठी आपले जीवन समर्पित करणा-या सामाजिक समतेच्या चळवळीचे उद्गाते, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह परिषदेतील जाहीरनामा शोषितांच्या मुक्तीचा आणि सामाजिक समतेच्या कृतिशील विचारांचा मंत्रजागर करणारे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जन्मोत्सव भारतासह सा-या जगभरात साजरी होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने त्यांच्या समतावादी विचारांचा आणि चळवळीचा मागोवा घेतला जाईल. आज कोणत्याही शाळा, कॉलेजात गेलात आणि बाबासाहेबांबाबत विध्यार्थ्यांना किती माहिती आहे हे विचारले, तर यातले तथ्य आढळून येईल. हीच परिस्थिती अनेक भारतीयांची आहे.

मुळात बाबासाहेब एकट्या महाराष्ट्राचे वा एका समाजाचे नाहीतच, तर संपूर्ण शतकाचे आणि शतकाला माणुसकीची प्रे-रणा देणारे ते एक अद्वितीय असे व्यक्तिमत्त्व आहे. यात दुमत असता कामा नये. डॉ. बाबासाहेब शेतक-यांचे कैवारी होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी



म्हणून सर्वपरिचित आहेत. तथापि, ग्रामीण भागाचे हितरक्षक आणि शेतक-यांच्या परिवर्तनासाठी त्यांनी मांडलेले विचार फारसे समोर आले नाहीत. त्यामुळे शेतीची हानी झाली. त्यांचे ग्रामीण समाज आणि शेतीबाबतचे विचार आजही राज्यकर्ते, नियोजनकार आणि शेतक-यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत. या ठिकाणी मला असे गंभीरपणे म्हणावेसे वाटते की, बाबासाहेबांना सर्वांनीच सोयीने वापरले आहे. अगदी त्यांच्याच म्हणणा-या अनुयायांनीही. जगात आदर्श ठरलेल्या सर्वात मोठया आणि सर्वसमावेशक अशा लोकशाहीची मूल्ये ज्या संविधानावर उभी आहेत ते संविधान लिहिण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. असे असताना या इतक्या सहज उल्लेखाशिवाय बाबासाहेबांची कर्तबगारी, त्यांनी दिलेली राजकीय, सामाजिक शिकवण आज आपण सोयीने बाजूला करतो ही बाब नजरेआड करून चालणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ग्रामीण समाजव्यवस्थेची प्रचंड जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते. ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंध करायचा, तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. आपल्या देशातील शेतकरी आणि राज्यकर्ते यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती अशी मानसिकता आहे. बाबासाहेबांचा या मानसिकतेलाच आक्षेप होता. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, राष्ट्रीय उत्पन्नाचा स्रोत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतक-यांसह अनेक शेतमजुरांना रोजगार देण्याचे माध्यम आहे. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून बघण्याचा दृष्टिकोन असला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. शेती विकसित होऊन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनला, तर ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडेल. राष्ट्राची अर्थव्यवस्थाही मजबूत होईल. रोजगारासाठीची स्थलांतरे टळतील. इतक्या दूरदृष्टीने व सखोलतेने त्यांनी शेतीकडे बघितले. शेतक-यांच्या शोषणाबाबतदेखील त्यांनी परखड विचार मांडले आहेत.

शासनाकडून पुरेसे आर्थिक पाठबळ न मिळाल्याने, शेतकरी सावकारांचा आधार घेतात. सावकारांच्या पाशातून नंतर त्यांची अंतापर्यंत सुटका होत नाही. शेतीतल्या "खोती' पद्धतीबद्दलही त्यांनी कडक शब्दांत भाष्य केले. कष्ट शेतक-याने करायचे आणि खोतक-यांनी फुकटचे खायचे, त्यांना मान्यच नव्हते. सावकार आणि खोतांना ते "आयत्या बिळावरचे नागोबा' असे संबोधित. इतक्या मोजक्या आणि शेलक्या शब्दांत त्यांनी सावकारी व्यवस्थेचे वाभाडे काढले. या व्यवस्थेला हद्दपार करण्यासाठी शासनाने शेतक-यांना बियाणे, खते, पाणी आणि पीक जोपासना खर्च दिला पाहिजे. शासनाला महसूल देणा-या शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे. "उदरदायित्व' या शब्दातून शासनाने शेतक-याचे पोशिंदा म्हणून असलेले ऋण फेडावे असे त्यांना अपेक्षित होते. यातून शेतक-यांचे कैवारी म्हणणा-या आजच्या शासनकर्त्यांनी बोध घेण्याची गरज आहे. शेती व्यवसायाचा संबंध त्यांनी समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाज व्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधले होते. त्यामुळेच जा-तीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची, तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल.

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतक-यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला, तर शेतमजूर आणि शेतीशी निगडित सर्वच घटकांना या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल. आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. हे बदल सामाजिक परिवर्तनासाठी पोषक ठरतील. आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरते.

आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे बाबासाहेबांना वाटत होते. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतक-याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतक-यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला शाश्वत पाणी पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. देशात घडणारे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे. जिरायती शेती, बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत. शेती व शेतमजूर समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल, असे मौलिक विचार त्यांनी मांडले. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारला, नदीच्या खो-यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली.

ही योजना "दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते. आपल्या शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा अशी खो-यांची विभागणी केली. यावरून डॉ. बाबासाहेब यांच्या दूरदर्शीपणाची लांबी व खोली लक्षात येते. डॉ. बाबासाहेबांनी सर्वात महत्त्वाची संकल्पना मांडली ती "शेतीचे राष्ट्रीयीकरण' करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन, त्या विकसित कराव्यात, अशा विकसित शेतजमिनी शेतक-यांना काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत.

पीक पद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानुसार, शेतमालाला रास्त भाव मिळेल. त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादनामुळे होणारे शेतमालाचे नुकसानही टळेल. आजही शेतक-यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाशी झगडावे लागते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतक-यांसाठी किती मोलाची आहे, हे अधोरेखित होते. बाबासाहेबांच्या संकल्पनेतूनच कमाल जमीनधा-रणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेती प्रणा-लीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्या-खो-यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अंमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे बाबासाहेबांच्या विचारांचाच प्रभाव दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब यांचे शेतीबाबतचे विचारधन राज्यकर्ते नियोजनकार व शेती तज्ज्ञांनी अभ्यासले पाहिजेत. दुर्दैवाने अनेकांना डॉ. बाबासाहेब हे शेतक-यांचे कैवारीदेखील होते, हे अजूनही ठाऊक नाही. त्यांच्या विचारांच्या उपेक्षेतून शासनकर्त्यांची उदासीनताच प्रकर्षाने दिसते. सत्याचे, समर्पण भावाचे, दूर-दृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, नवविचारांचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे, मानव-तेचे सर्व समाजाच्या कल्याणाचे दर्शन घडविणारे बाबासाहेब ज्ञानयात्री, विश्वयात्री होते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब यांच्या शेतीविषयक सूचनांची अंमलबजावणी केली, तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन घडेल. राज्यात होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या, शेतीसमोरचे प्रश्न यांचा विचार केला, तर आजही या प्रकाशयात्रीचे स्मरण प्रेरणादायी ठरणारे आहे. या युगपुरुषाला विनम्र अभिवादन!

**विनोद धोंगडे नैनपुर**

# समतेचे तत्व घरातूनच पाळणे सुरू करावे–प्रा.लक्ष्मण यादव

**गोंदिया:–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लहानपणापासूनच वर्णव्यवस्थेचे चटके सहन करावे लागले. ते चित्र त्यांच्या मनावर बिंबले. त्यामुळे वर्णव्यवस्थेची असमानता मोडून काढत समता, न्याय आणि बंधुता हे तत्व रुजविण्याचा त्यांचा संकल्प होता. त्याकरिता त्यांनी संपूर्ण आयुष्य झिजविले. अस्पृशांना त्यांनी न्याय मिळवून दिला. मात्र आजही काही असामाजिक तत्व डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेली व्यवस्था मोडण्यासाठी सक्रिय आहेत. आपल्यावर जुने दिवस येवू नयेत, याकरिता आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण द्यावे. स्त्री–पुरूष समानतेचे तत्व घरातूनच रुजविण्याची सुरुवात करावी, असे



मत दिल्ली विश्वविद्यालयाचे प्रा. लक्ष्मण यादव यांनी व्यक्त केले.

सुभाष शाळेच्या आवारात प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक सामाजिक जयंती उत्सव कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते गुरुवारी बोलत होते. व्यासपिठावर अखिल भारतीय कुमी किसान मजूर महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार बघेल, दंगलकार विद्रोही कवी नितीन चंदनशिवे, कार्यक्रमाच्या अध्यक्ष सविता उके आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. लक्ष्मण यादव पुढे म्हणाले, देशात ९० टक्के लोकसंख्या असलेल्या घटकावर अन्याय सुरू आहे. त्यांना संविधानाच्या माध्यमातून मिळालेल्या हक्काचे हनन करणे सुरू आहे. संविधानाची मोडतोड सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य रंजल्या–गांजल्यांसाठी समर्पित केले. त्यांनी त्याकरिता अहोरात्र लढा देत कायदा केला. मात्र त्याच कायद्यावर गेल्या काही वर्षांपासून टाच आणली जात आहे. आम्ही उघड्या डोळ्यांनी सर्व बघत आहोत. रात्र वैऱ्याची असून आता त्याविरोधात पेटून उठण्याची गरज आहे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता हे तत्व देशात कायम राहावे, यासाठी आपले कोण आणि परके कोण हे ओळखावे लागणार आहे. केंद्र शासनाने दोन वर्षांपासून लागू केलेले शिक्षण धोरण घातक आहे. त्यात आता सार्वजनिक उपक्रम विकण्याचा सपाटा सुरू केल्यामुळे नोकऱ्या संपुष्टात आल्या आहेत. बहुजन समाजाने आपल्या न्याय हक्कांकरिता लढण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी नंदकुमार बघेल यांनी कृषी धोरण, समाजाची व्यवस्था तसेच नितीन चंदनशिवे यांनी समाजव्यवस्थेवर आपल्या कवितेच्या माध्यमातून प्रहार केला.

# सरकार सरकारी उद्योग विकून आरक्षण संपवित आहे-बी.जी.कोळसे पाटील

**भंडारा:–** जातीधर्माच्या बंधनात न अडकता ओबीसींनी आपल्या हक्क आणि अधिकारासाठी एकजूट होण्याची गरज आहे, असे मत शिक्षक भारतीचे राज्य उपाध्यक्ष राजेंद्र झाडे यांनी व्यक्त केले. ओबीसी जनगणना परिषदेत मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी शिक्षक भारतीचे संस्थापक व आमदार कपिल पाटील, सेवानवृत्त न्या.बी.जी.कोळसे पाटील, अध्यक्ष प्रदीप ढोबळे, शिक्षक भारतीचे विभागीय अध्यक्ष भाऊराव पत्रे, अशोक कापगते, समन्वयक सदानंद इलमे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत तुकोबा, श्री छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, रार्जशी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. आमदार कपिल पाटील म्हणाले, ओबीसी बांधवांनी जातीधर्माचा विचार न करता ओबीसींना संविधानिक हक्क मिळणे आवश्यक आहे. यासाठी ओबीसी जनगणनेची गरज आहे.



हक्कासाठी ओबीसी जनगणनेचे भोंगे वाजवणे आवश्यक आहे. न्या.बी.जी.कोळसे पाटील म्हणाले, जेव्हा ओबीसी जनगणनेचा प्रश्न येतो, तेव्हा देशात हिंदू–मुसलमान असा संघर्ष उभा केला जाऊन ओबीसींचे लक्ष विचलित केले जाते व ओबीसी जनगणनेपासून ओबीसींना दूर ठेवले जाते. म्हणून ओबीसींनी धर्माच्या राजकारणात पडू नये. इंजि. प्रदीप ढोबळे म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच ओबीसींचे खरे उद्धारक आहेत याची जाणीव ओबीसी समाजबांधवांनी ठेवावी आयोजन ओबीसी जनगणना परिषद, ओबीसी सेवा संघ व शिक्षक भारती, शासनमान्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. संचालन जिल्हा समन्वयक संजय आजबले यांनी तर प्रास्ताविक सदानंद इलमे यांनी केले.

आभार गोपाल देशमुख यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ.बाळकृष्ण सार्वे, तेजस शेंडे, गोपाल सेलोकर, गोपाल देशमुख, भय्याजी लांबट, के.झेड. शेंडे, वामन गोंधळे, अंजली बांते, अनिता बोरकर, प्रभुजी मने, मंगला वाडीभस्मे, मंगला डहाके, पंकज पडोळे, सुमित पंचबुद्धे, मनोज बोरकर, पांडुरंग फुंडे, उमेश सिंगनजुडे, विनोद किंदर्ले, दिनेश पिकलमुंडे, ईश्वर निकोडे, विकास वंजारी, विनोद हटवार, दिनेश साकुरे, लेकराज साखरवाडे, मरेश्वर तिजारे, आनंदराव उरकुडे, गोपाल नाकाडे, पवन साळवे, पंकज जाधव इ.सहकार्य केले.

# बाबासाहेबांचा पुतळा विद्यार्थ्यांना सदैव प्रेरणा देत राहील : आ.विजय रहांगडाले

**तिरोडा :** अत्यंत विपरित व कठीण परिस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देश–विदेशात जावून शिक्षण घेतले. देशातून ते सर्वाधिक उच्चविद्याविभूषित ठरले. त्यांचे संपूर्ण जीवनकार्य सर्वांसाठी प्रेरणादायक आहे. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात शिक्षणाला सर्वाधिक महत्व दिले.

ग्राम चिरेखनी येथे जिल्हा परिषद शाळेसमोर बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. त्यामुळे हा बाबासाहेबांचा पुतळा विद्यार्थ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. असे प्रतिपादन आ. विजय रहांगडाले यांनी केले. महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती समारंभ ग्राम चिरेखनी येथे नालंदा बुद्ध विहार समिती व भारतीय बौद्ध महासभेच्या



वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. १४ एप्रिल रोजी आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते, माजी आ.दिलीप बंसोड यांच्या अध्यक्षतेखाली अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी विशेष मार्गदर्शक म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे व पोलीस निरीक्षक योगेश पारधी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून जिप सदस्य प्रवीण (पवन) पटले, जिप सदस्य किरणकुमार पारधी, जिप सदस्य चत्रभुज बिसेन, जिप सदस्य ॲड.माधुरी रहांगडाले, पंस सदस्य हुपराज जमईवार, पंस सदस्य सुनंदा पटले, मेरिटोरियस पब्लिक स्कूलचे संस्थापक मुकेश अग्रवाल, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ओम कटरे, सामाजिक कार्यकर्ते ओम पटले, महाप्रज्ञा बुद्धविहार कमिटी तिरोडाचे अध्यक्ष अतुल गजभिये उपस्थित होते.

याशिवाय गावातील मान्यवर उपसरपंच रंजिता रिनाईत, ग्रामपंचायत सदस्य घनश्याम पारधी, सुरेन्द्र कोटांगले, नितेश कटरे, संजयकुमार पारधी, हस्तकला पारधी, शिला बिसेन, पौर्णिमा पारधी, सुनीता पटले, ग्रामसेविका संगीता थोटे, पोलीस पाटील यमेश्वरी कुर्वे–फाये, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष देवचंद रिनाईत, तंमुस अध्यक्ष नंदकुमार बिसेन, सामाजिक कार्यकर्ते रमेश टेंभरे, माजी सरपंच जगन्नाथ पारधी, माजी उपसरपंच सोनू पारधी, सामाजिक कार्यकर्ते राजू ठाकरे आदि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ७ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालत

**गोंदिया:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण निर्देशानुसार व राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे मार्गदर्शनाप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया यांचेमार्फत जिल्हा न्यायालय, कामगार न्यायालय तसेच जिल्ह्यातील तालुका विधी सेवा समित्यामार्फत सर्व तालुका न्यायालयामध्ये ७ मे २०२२ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# महामानवांच्या विचार चिंतनाने चिंता नष्ट होईल-आ.चंद्रिकापुरे

**अर्जुनी मोरगाव:–** मनुष्याने जीवन अधिक कष्टमय केले. वक्त्यांचे विचार ग्रहण करण्याची समता आजच्या पिढीत नाही. महापुरुषांचे विचार डोक्यात उतरविणे पेक्षा डोक्यावर घेऊन नाचण्याची नवीच रित सुरू झाली. आम्ही महापुरुषांचे पुतळे उभारतो मात्र त्यांचे विचार आचरणात आणत नाही. पुतळ्यांची संरक्षण आणि विचारांचे संरक्षण यातील मार्ग समजत नाही. बुद्धांनी सांगितलेला अष्टांग मार्ग, पंचशीलेचे दैनंदिन जीवनात पालन करतो का? याचे आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. बाबासाहेबांचे विचार जगभर पसरवायचे हा विचार योग्य पण स्वतः बद्दल आत्मचिंतनाची गरज आहे. जाती विरहित विचाराने सामाजिक व्यवस्थेचा विकास होईल. नीतिमान समाज निर्माण होईल. मानव जातीतील



चिंता समूळ नष्ट करायची असेल तर महामानवांच्या विचारांचे चिंतन आवश्यक आहे असे प्रतिपादन अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले. ते शहरातील संविधान चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व समता सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून उपस्थितांना संबोधित होते.

यावेळी नगरपंचायत नगराध्यक्ष मंजुषा बारसागडे, सभापती दानेश साखरे, उपसभापती दिक्षा शहरे, नगरसेवक सर्वेश भुतडा, एसकुमार शहारे, राधेश्याम भेंडारकर, अतुल बनसोड, सागर आरेकर, नगरसेविका शीला उईके, सपना उपवनसी, संध्या शाहारे, सुषमा दामले, मंजुषा चंद्रिकापुरे, माजी नगराध्यक्ष पोर्णिमा शहारे, डॉक्टर देवेंद्र घरतकर, डॉक्टर भारत लाडे, लक्ष्मीकांत मडावी, प्रा.सांगोळे उपस्थित होते. नगरपंचायतच्या सामाजिक विकास योजना अंतर्गत बौद्ध विहार व सभागृहाचे लोकार्पण आ.चंद्रिकापुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे चंद्रिकापुरे यांनी सात वर्षापासून देशात विषारी वातावरण सुरू आहे. हिंदुराष्ट्राची तळमळ,धर्म संप्रदायाच्या नावाखाली द्वेष पसरविणे सुरू आहे.देशात समान नागरी कायद्याचा विचार सुरू आहे. गत सात वर्षात आरक्षणाचा लाभ बंद झाला. उच्चवणीयांचा साम्राज्य विस्तार सुरू आहे. राजकीय घटनांचा अभ्यास सर्वांनी केला पाहिजे. बाबासाहेबांच्या विचारांनी वैचारिक लढाई लढण्यास सज्ज व्हा असे आवाहन उपस्थितांना केले. यानिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्पुरुष शहारे. संचालन सु. मो.भैसारे आणि आभार जगझापे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि एकता मंचच्या बौद्ध उपासक–उपासिका यांनी परिश्रम घेतले.

# आमगाव-देवरी मतदार संघातील वीज लोडशेडिंग रद्द करा

**देवरी :** गोंदिया जिल्ह्यातील आमगांव–देवरी विधानसभा मतदार संघातील देवरी, आमगाव व सालेकसा हा तालुका आदिवासी, अतिदुर्गम, संवेदनशील, नक्षलग्रस्त व डोंगराळ भागात आहे. येथे सुरू असलेली वीज लोडशेडिंग रद्द करून वीज अखंडित सुरू करण्या संदर्भात आमगाव–देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार सहषराम कोरोटे यांनी राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्याशी भेट घेऊन चर्चा केली.

निवेदनात आमदार कोरोटे यांनी आमगांव–देवरी विधानसभा मतदार संघातील देवरी, आमगाव व सालेकसा हा तालुका आदिवासी, अतिदुर्गम, अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त व डोंगराळ भागात वसलेला आहे.परंतु वीज वितरण कंपनी द्वारे सध्या या भागात रात्रीचे लोडशेडिंग सुरू केले आहे. या लोडशेडिंगमुळे रात्रीला घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागील दोन वर्षांपासूब बंद असलेली वीज लोडशेडिंग पुन्हा सुरू झाल्याने या भागातील जनतेला भर उन्हाळ्यात त्रास सहन करावा लागत आहे.तरी रात्रीची सुरू असलेली लोडशेडिंग रद्द करण्यात यावे अशी मागणी



केली आहे.

### विविध खेळाचे उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

गोंदिया: क्रीडा व युवा सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल समिती व क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच विविध संघटना यांचे संयुक्त विद्यमाने विविध खेळाचे प्राथमिक कौशल्य विकास उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन २० एप्रिल ते ५ मे २०२२ या कालावधीत आयोजिते करण्यात आले आहे.

## रेती उत्खनना दरम्यान दफन केलेले मृतदेह बाहेर

**आमगाव:** महसूल विभागांतर्गत येणाऱ्या आमगाव तालुक्यातील मानेकसा घाटावर मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन केले जात आहे. रेतीच्या उत्खनना दरम्यान नदीच्या काठावर दफन केलेले मृतदेह जमिनी बाहेर येत असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे या प्रकाराची गावकऱ्यांनी महसूल विभागाकडे तक्रार केली आहे. त्या ठिकाणी रेती उपसा करताना दोन प्रेत कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याची माहिती आहे. दरम्यान, या प्रकारामुळे गावकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दफन केलेले मृतदेह रेती उत्खनना दरम्यान बाहेर येत असून, अवैध उत्खनन करणारे मात्र या कडे दुर्लक्ष करून रेतीची तस्करी करीत असल्याची माहिती आहे.

मानेकसा रेती घाटावरून मोठ्या प्रमाणात रेतीचे अवैध उत्खनन केले जात असल्याची माहिती आहे. अवैध रेती वाहतूक केल्या प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत. मात्र, यानंतरही रेतीचे अवैध उत्खनन सुरूच आहे. विशेष या परिसरातील गावकरी हे मानेकसा घाटावरच मृतदेहावर अंत्यसंस्कार व दफनविधी करतात. मात्र, या घाटावर दफन केलेले मृतदेह बाहेर येत आहेत. महसूल विभागाने या प्रकाराकडे लक्ष देऊन अवैध रेती तस्करीला आळा घालण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# देवरीच्या आदिवासी प्रकल्प कार्यालयात अनागोंदी कारभार

## विदर्भ अनूदानित आदिवासी आश्रमशाळा शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी संघाचा आरोप

**गोंदिया:–** देवरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात अनागोंदी माजली असून कर्मचाऱ्यांचे वेतन असो की कर्मचाऱ्यांची नियुक्तीत गैरव्यवहार होत असल्याचा आरोप नागपूर येथील विदर्भ अनूदानित आदिवासी आश्रम शाळा शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने निवेदनातून केला आहे.

संघटनेने दिलेल्या माहितीप्रमाणे, देवरी प्रकल्पातील श्रीकृष्ण अवधूत अनुदानित आश्रमशाळा कोकणा जमी येथील सहायक शिक्षक सुशील अंबादे यांचे दि. ३१ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. यामुळे श्री अंबादे यांचे जागी त्यांच्या पत्नी सुशिला यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे क्रमप्राप्त आहे. श्रीमती सुशीला अंबादे या बीएडीएड असून त्यांना वर्ग ६ ते ८ या वर्गावर नियुक्ती नियमानुसार देता येते. असे असताना संबंधित संस्थेला वारंवार विनंती अर्ज आणि विनवनी करुन सुद्धा त्या संस्थेने प्रकल्प कार्यालयाकडे त्यांचे प्रकरण पाठविले नाही. परिणामी, अर्जदार सुशिला यांना प्रकल्प कार्यालयाकडे पोस्टाने आपला विनंती अर्ज पाठवावा लागला. असे असताना सुद्धा त्यांच्या अर्जावर प्रकल्प कार्यालय आणि संबंधित संस्थेने कोणतीही कार्यवाही केली नाही. यामागे संस्था आणि प्रकल्प कार्यालय यांच्यात संगनमत असून आर्थिक देवाणघेवाण साठी हे प्रकरण लांबिवले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन सध्या ऑनलाइन पद्धतीने होत आहे. याकामासाठी देवरीच्या प्रकल्प कार्यालयात एका महिला कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु, सदर महिला कर्मचारी सदर काम करण्यास इच्छुक नसल्याने त्याऐवजी देवरी प्रकल्पातीलच एक कर्मचारी




प्रकल्पांतग्रत येणाऱ्या शाळांच्या कर्मचाऱ्याचे वेतन देयके तयार करण्याचे काम करतो. हा कर्मचारी प्रती कर्मचारी ३०० ते ५०० रुपये दर महिन्याच्या वेतनापोटी आकारणी केल्या शिवाय देयकेच तयार करीत नसल्याचा आरोप सुद्धा संघटनेने केला असून कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट सुरू असल्याचे म्हणणे आहे.

यासंबंधाने अप्पर आयुक्त यांचेकडे तक्रार करणार असल्याचे देवरीचे सहायक प्रकल्प अधिकारी सोनवने यांचे लक्षात आणून दिले. यामुळे श्री सोनवने यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यासोबत दि.११ रोजी बैठक लावली होती. यामध्ये सहायक प्रकल्प अधिकारी सोनवने यांनी जातीने लक्ष घालून समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे. देवरी येथील प्रकल्प कार्यालयाला भेट देणाऱ्या शिष्टमंडळात संघटनेचे अध्यक्ष तेजराज राजुरकर, सचिव हेमंत कोचे, सचिन मांडवगडे, सुरेश राठोड, वनिता अंबादे आदी पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

### कर्मचाऱ्यांनी दिशाभूल करू नये : विकास राचर्लेवार

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी अंतर्गत शुभांगी सुशील अंबादे यांना अनुकंपा तत्त्वावर रुजू करुन घेण्यासाठी प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून मुख्याध्यापक व सचिव यांच्याशी वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यामुळे यासंदर्भात कुठलीच कार्यवाही केली जात नसल्याचा आरोप हा तथ्यहिन असून शिक्षक संघटनेने हेतूपुरस्पर दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे प्रकल्प अधिकारी विकास राचर्लेवार यांनी म्हटले आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत २३ अनुदानित आश्रम शाळा (प्राथ. व माध्य. मिळून एकूण ४३) कार्यरत आहेत. या शाळांचे वेतन देयक आश्रम शालार्थ प्रणालीमध्ये तयार करण्यात येते. त्याकरिता प्रत्येक मुख्याध्यापकास वेतन देयक तयार करण्याकरिता शाळानिहाय स्वतंत्र असिस्टंट लॉगिन आयडीवर वेतन देयके तयार करुन या कार्यालयाकडे डीडीओ लॉगिनवर सादर केले जातात. प्राप्त सर्व शाळांचे देयके एकत्रित करून देयके तयार करून पुढील कार्यवाही करिता उपकोषागारात सादर करण्यात येतात. त्यानंतर कोषागारातून देयके पारीत झाल्यानंतर सीएमपी प्रणालीद्वारे रक्कम शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खातेवर ऑनलाइन पद्धतीने जमा होतो. असिस्टंट आयडीवरून वेतन देयके तयार करण्याची जबाबदारी ही त्या–त्या शाळांची आहे. ती या कार्यालयाची नाही. याकरिता कोणत्याही शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून रक्कमेची मागणी करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. सातवा वेतन आयोग थकबाकी सध्याच काढू नये, असे वरिष्ठ कार्यालयाकडून निर्देश प्राप्त आहे. त्याबाबत स्क्रीनशॉट सोबत जोडण्यात येत आहे. सातवा वेतन आयोग थकबाकीकरिता या कार्यालयाचे पत्रान्वये १६ कोटी ३० लाख निधी मागणी केली आहे. याकरिता शासनाकडून विशेष तरतूद प्राप्त झाले नाही. त्यामुळे माहे. फेब्रुवारी २०२२ चे नियमित वेतन देयके सादर करण्याबाबत या कार्यालयाकडून सर्व शाळांना सूचना देण्यात आले होते. कोणत्याही शाळांची सातवा वेतन आयोग थकबाकी काढण्यात आली नाही. शिक्षक संघटनेने केलेले आरोप हे तथ्यहिन असल्याचे म्हटले आहे.**



# ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना १४.९२ कोटीचा अबंधित निधी

**गोंदिया:** १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या हप्त्यापोटी केंद्र सरकारकडून मुक्त करण्यात आलेल्या निधी राज्य सरकारने राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर केला आहे. या अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील ग्राम पंचायतींना १२ कोटी १७ लाख ३ हजार ९३४, पंचायत समितींना १ कोटी ३७ लाख तर जिल्हा परिषदेला १ कोटी ३७ लाख रुपयांचा अबंधित निधी मंजूर झाला आहे. तसेच शासन निर्णय ग्रामविकास मंत्रालयाने १३ एप्रिल रोजी निर्गमित केले आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला बळ मिळणार आहे.



महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वितरित करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विवरणपत्र अन-ुसार निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरित करण्यात आला आहे. हा निधी सर्व पंचायत राज संस्थांना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतम यामध्ये अनुक्रमे १०:१०:८० या प्रमाणात वितरित करण्यात येत आहे.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या अबंधित निधीच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम जिल्हा कोषागारद्वारे पंचायत समिती, ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्या बँक़ खात्यात ग्रामविकास विभागामार्फ जमा करण्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणारी निधी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निधीच्या वितरणाचे नियोजन, संनियंत्रण व समन्वयाची जवाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यामुळे प्राप्त होणाऱ्या अबंधित निधीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांना गती मिळणार आहे.

जिल्ह्यातील ग्राम पंचायतींना १२ कोटी १७ लाख ३ हजार ९३४, पंचायत समितींना १ कोटी ३७ लाख ९० हजार ३६२ तर जिल्हा परिषदेला १ कोटी ३७ लाख ९० हजार ३६२ रुपये असा एकूण गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण स्वराज्य संस्थांना १४ कोटी ९२ लाख ८४ हजार ६५८ रुपयाचा अबंधित निधी मंजूर झाला आहे.

**तालुकानिहाय ग्रामपंचायतींना मिळालेला निधी**

| तालुका | ग्रामपंचायत | पंचायत समिती |
|---|---|---|
| गोंदिया | ३,२४,८०,४३४ | ३६,६६,५४४ |
| तिरोडा | १,६९,८८,५३२ | ९२,२१,६७६ |
| आमगाव | १,०८,०५,८९५ | १२,२२,१०२ |
| सालेकसा | ९१,९७,७१२ | १०,४३,२९९ |
| देवरी | १,१२,३८,३८७ | १२,८७,०८१ |
| गोरेगाव | १,३०,५८,४३१ | १४,७९,१८० |
| सडक अर्जुनी | १,२३,२६,९२७ | १३,९८,१४४ |
| अर्जुनी मोरगाव | १,५६,०७,६१६ | १७,७०,३३६ |

# २०० कोल्हापूरी बंधारे नादुरुस्त, दुरुस्तीच्या नावावर निधीची व्हिलेवाट

**गोंदिया:** जिल्ह्यात ठिकठिकाणी लाखो रुपये खर्चून कोल्हापुरी बंधारे तयार करण्यात आले. मात्र बंधारे तयार केल्या नंतर त्यांच्यादेखभाल दुरुस्तीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने हे कोल्हापुरी बंधारे केवळ शोभेची वस्तू ठरत आहेत. यंदा पावसाळ्यात झालेल्या खंडीत पावसाची कसर परतीच्या व अवकाळी पावसाने भरुन काढली. त्यामुळे जिल्ह्यातील धरणांसह प्रकल्प व तलावात मुबलक पाणीसाठा झाला.मात्र उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच सूर्य आग ओकू लागल्याने जिल्ह्या-तील प्रकल्पांची घरघर सुरु झाली आहे. सद्यस्थितीत मध्यम प्रकल्पांमध्ये २३ टक्के पाणीसाठी आहे तर लघु प्रकल्पात ३५ टक्के पाणीसाठी आहे. तर दुसरीकडे कोल्हापुरी बंधारे कोरडे पडण्याच्या मार्गावर असून बंधाऱ्यांमध्ये केवळ ४.६२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.



जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे विभागांतर्गत २९४ कोल्हापुरी बंधारे आहेत. या बंधाऱ्यांमुळे १० हजार ७४ हेक्टर क्षेत्राचे सिंचन होऊ शकते. मात्र ३९ बंधारे ना दुरुस्त असल्यामुळे हजारो हेक्टर शेती सिंचीत होऊ शकत नाही.

जिल्ह्यातील २०० कोल्हापुरी बंधारे हे भग्नावस्थेत आहेत. या बंधाऱ्यांमुळे हजारो हेक्टरला सिंचनाची सोय होऊ शकते. मात्र बंधाऱ्याच्या देखभाल दुरुस्तीकडे जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याने अवस्था बिकट झाली आहे. पाणी साठून राहण्याऐवजी ते वाहून जात आहे. परिणामी शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे. नवीनबांधकामात अधिकाऱ्यांना मिळकत मोठी मिळत असल्याने ते नवीन कामाकडे लक्ष देतात. परंतु बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी किंवा बंधाऱ्यांचे काम पद्धतशीर व्हावे याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष नाही.

कोल्हापुरी बंधाऱ्यांना पुराचा तडाखा बसल्याने या बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूला खिंडपडली आहे. त्यामुळे बंधाऱ्यातील पाणी वाहून जाते.त्यामुळे लाखो रुपये खर्चून करून तयार करण्यात आलेले हे बंधारे केवळ नावा पुरतेच ठरत आहे. कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या लाखो रुपये किमतीच्या लोखंडी प्लेट चोरीला गेल्या आहेत.

# कमी पटसंख्येच्या शाळांवर बंदचे संकट

**गोंदिया:** राज्यातील १० किंवा १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे समायोजन करण्याचा गतवर्षी घेण्यात आला होता. त्याला विरोध झाल्यानंतर तो थांबवण्यात आला. मात्र आता पुढील वर्षी सुरू होणाऱ्या नवीन शैक्षशै णिक धोरणाच्या अंमलबजावणीत या कमी पटसंख्येच्या शाळांबाबत निर्णयर्ण घेतला जा णार आहे. जिल्ह्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्य वाढत आहे, तर मराठी शाळांच्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे.

सरकारने गोंदियातील ६३, भंडारा २९, नागपूर १२८, चंद्रपूर १३३, गडचिरोली ३८४, बुलडाणा २४, वासीम २८, यवतमाळ ७९, अमरा-वती १२१, अकोला ५५, वर्धा ७३ या विदर्भातील ११17 शाळांना कुलूपबंद होणार आहेत. शाळांचे अन्य शाळेत समायोजन करताना विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची व्यवस्था करणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाने अध्यादेशाद्वारे स्पष्ट केले आहे. शाळा बंद करण्यासाठीची किमान पटसंख्या दहा इतकी निश्चित केली आहे. या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांना सात ते आठ किलोमीटरचा प्रवास करावा लागणार आहे. परिणामी विद्यार्थी शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील जवळपास ६३ शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या १० पेक्षा कमी आहे. तर विदर्भात १ हजार ११७ शाळांमध्ये १० पेक्षा कमी पटसंख्या आहे. नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षक निश्चिती करताना पटसंख्या हा निकष निश्चित करण्यात आल्याने कमी

पटसंख्येच्या शाळांना आता शिक्षकच मिळणार नाहीत, अशी व्यवस्था शिक्षण विभागाने केली आहे. त्यामुळे या शाळा आता इतर शाळांमध्ये समायोजित करताना विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता देण्याचे धोरण शिक्षण विभागाने स्विकारले आहे. त्यामुळे कमी पटसंख्या असलेल्या मराठीशाळांना पूर्णविराम मिळणार आहे. नविन शैक्षणिक धोरणात पहिली ते पाचवी पुढे सहावी ते आठवी आणि नववी ते अकरावी तसेच १२ ते १५ असे टप्पे करण्यात आले आहेत.

चालू शैक्षणिक वर्षात दहावी बोर्ड कायम असले तरी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात दहावी बोर्ड बंद करुन अकरावी बोर्ड अस्तित्वात येणार आहे. पूर्वी एका तुकडीला दीड शिक्षक असा निकष होता, मात्र आता सरासरी हजेरी २० मुलांची असेल तर ग्रामीण भागात १ शिक्षक दिला जातो. त्यामुळे मुळात शिक्षकांची संख्या ही घटलेली आहे. ज्या तुकडीला सरासरी २० हजेरी नाही, त्याला शिक्षकच दिला जात नाही. परिणामी ग्रामीण भागात शिक्षकांचा मोठा तुटवडा आहे. त्यामुळे कमी पटसंख्येच्या शाळेत जिल्हा परिषदांना शिक्षक देणे आता शक्यच होणारे नाही. परिणामी या शाळा अघोषितपणे का असेनात बंदच होणार आहेत. बदललेला अभ्यासक्रम, परिसर विकासाचा आलेला नवीन विषय आणि प्रात्यक्षिकांवर दिली गेलेली भर हे नवीन शैक्षणिक धोरण शिक्षकाविना पुढे सरकणे शक्य नाही.

परिणामी ग्रामीण भागातील शाळांना शिक्षक यापुढे मिळणे अवघड झाले आहे. २०२१ च्या विद्यार्थी पटसंख्येच्या निकषाप्रमाणे राज्यातील ३०३७ शाळा या बंद करण्याचे नियोजन होते. त्याला विरोध झाल्याने ते थांबले असले तरी आता या शाळांना शिक्षक न मिळण्याची व्यवस्था करण्यात आल्याने शाळांची शैक्षणिक कोंडी झाली आहे. राज्य सरकारने १० विद्यार्थ्यांपेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याचा घाट पुन्हा एकदा घातला आहे. यासंदर्भात प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोटघरे यांना विचारले असता, कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यासंदर्भात कोणतेही ते शालेय शिक्षण विभागाचे पत्र मिळाले नसल्याचे त्यांनी सांगीतले.

# विद्युत करंटमुळे बैलासह महिलेचा दुर्दैवी मृत्यू

**गोंदिया-** जिवंत विद्युत पुरवठा होत असताना तुटलेल्या ताराचा लोखंडी सलाख व कपडे वाळविण्याचा लोखंडी ताराशी संपर्क आल्याने कपडे वाळविण्यासाठी गेलेल्या महिलेचा व त्यानंतर बैलाचा विद्युत करंट लागून घटनास्थळी मृत्यू झाल्याची घटना आमगाव तालुक्यातील पानगाव येथे १९ एप्रिल रोजी सकाळी घडली. मृतक महिलेचे नाव प्रेमकला जितेंद्र पटले (३४) रा. पानगाव असे आहे.मृतक महिला ही नित्याप्रमाने कामे आटोपून मोठ्या बाजूच्या आंगणात असलेल्या लोखंडी तारावर कपडे वाळविण्यासाठी गेली असता या ताराला विद्युत करंट असल्याने महिलेला करंट लागून तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. आजूबाजूच्या लोकांनी लाकडी काठीने विद्युत ताराला बाजूने सार-ले. यावेळी सदर विद्युत प्रवाही तार जवळच असलेल्या बैलाच्या आंगावर पडल्याने बैलाचा ही घटनास्थळी मृत्यू झाला.

# ओबीसींचे वसतिगृह सव्वादोन वर्षापासून घोषणेतच

**गोंदिया:** ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेत वाढ करून स्पर्धेत सक्षम करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने ७२ वसतिगृह उभारणार असल्याचे जाहीर केले. सव्वादोन वर्षांचा कालावधी उलटूनही हे वसतिगृह प्रत्यक्षात आलेले नाहीत. यापूवी फ डणवीस सरकारने ३६ ओबीसी वसतिगृहांची सोय करणार असल्याचा शासन निर्णय काढला होता. ओबीसींचे वसतिगृह केवळ घोषणांमध्ये अडकत असल्याने ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये संताप वाढला आहे. राज्य सरकारचे वसतिगृह उभारणीकडे दुर्लक्ष कायम राहिल्यास ओबीसी अधिकार मंच,ओबीसी संघर्ष कृती समितीसह इतर ओबीसी संघटनांनी आक्रमक भूमिका घेणार असल्याचा इशारा दिला आहे.



महाराष्ट्र विधान मंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या ऑक्टोबर २०१५ मधील पुणे दौ?यात झालेल्या बैठकीत जिल्हास्तरावर मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी नवे शासकीय वसतिगृह सुरू करण्याची सूचना राज्य सरकारला करण्यात आली होती. याला १५ जानेवारी २०१९ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. नंतर केंद्र सरकारच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेंतर्गत १०० विद्यार्थी क्षमतेच्या एका वसतिगृहाच्या इमारत बांधकामासाठी प्रती विद्यार्थी ३ लाखांचा निधी दिला जाणार होता. यात केंद्र सरकार मुलांसाठी ६० तर मुलींसाठी ९० टक्के निधी देणार होते. उर्वरित वाटा राज्य सरकारला द्यायचा होता. फडणवीस सरकारने ३० जानेवारी २०१९ रोजी शासन निर्णय काढून राज्यातील इतर मागास प्रवर्गातील मुलांसाठी १८ आणि मुलींसाठी १८ अशा एकूण ३६ वसतिगृहांना मान्यता दिली होती. सरकारबदल झाल्यानंतर चंद्रपुरातील एका अधिवेशनात ओबीसी कल्याणमंत्री विजय वडेट्टीवार यांनी ही संख्या दुप्पट करीत राज्यात ७२ वसतिगृह उभारण्याची घोषणा केली,तीच घोषणा नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पाच्यावेळीही पुन्हा केली.सव्वादोन वर्षांपासून ओबीसी वसतिगृहाची वड्डेटीवार घोषणाच करीत बसलू असून एकही वसतीगृह उभे राहू शकलेले नाही.तरीही काही ओबीसींचे तथाकथीत नेते या मंर्त्याच्या घोषणेचे समर्थन करीत आपले राजकीय स्वार्थ साधण्यातच व्यस्त झालेले आहेत.

**सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहात सोय करून आर्थिक मदत करावी**

**राज्य सरकारने ३० जानेवारी २०१९ रोजी परिपत्रक काढून इतर मागासवगीय कल्याण मंत्रालय स्वतंत्र करून वेगळ्या वसतिगृहाची घोषणा केली. नवे कर्मचारी, इमारती उभारणे, भाड्याने घेण्यासाठी बराच कालावधी जात असल्याने मोठ्या प्रमाणावर इतर मागासवगीय विद्याथी वसतिगृह प्रवेशापासून वंचित आहेत. त्यामुळे समाजकल्याण विभागांतर्गत अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची क्षमता वाढवून २० टक्के इतर मागासवगीय विद्यार्थ्यांना निवास, जेवण व इतर सुविधा पुरविण्यासाठी इतर मागासवगीय कल्याण विभागाने निधी द्यावे.तसेच बहुजन ओबीसी कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी चालू वर्षापासून ओबीसींसाठी वसतिगृह सुरू होणार असल्याचे सांगितले होते.सातत्याने केवळ आश्वासने आणि घोषणा त्यांच्यामार्फत केल्या जात आहेत. सरकारला वसतिगृह सुरू करणे शक्य होत नसल्यास स्वाधार योजनेच्या धतीवर आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोराम,ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे यांनी केली आहे.**

मुळात १६ मे १९८४च्या शासन निर्णयानुसार मागासवगीय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास आणि इतर मागासवगीय विद्यार्थ्यांसाठी २० टक्के जागा राखीव ठेवण्यात येत होत्या. या जागावांवर ओबीसी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. ३० जुलै २०१४च्या परिपत्रकात अनुसूचित जातीसाठी ८० टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी दहा टक्के आणि इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी दहा टक्के आरक्षण वसतिगृहांमध्ये दिले गेले. इतर मागासवगीयांचे स्वतंत्र कल्याण मंत्रालय स्थापन झाल्यानंतर २१ डिसेंबर २०१८च्या शासन निर्णयानुसार समाजकल्याण विभागाच्या सर्व वसतिगृहांमध्ये ८० टक्के अनुसूचित जातीचे विद्याथी, तीन टक्के अनुसूचित जमातीचे, पाच टक्के विमुक्त जाती व भटक्या जमातीचे, पाच टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व इतर मागास प्रवर्गातील विद्याथी, दोन टक्के विशेष मागास प्रवर्गाचे, तीन टक्के दिव्यांग तर दोन टक्के अनाथ विद्याथी असे वर्गीकरण करण्यात आले. पण, इतर मागासगीय समाजातील विद्याथी या वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित असल्याचा आरोप ओबीसी नेत्यांनी केला आहे. यासंदर्भात गेल्या एक दशकपासून सरकारकडे पाठपुरावा सुरु असून ओबीसी अधिकार मंच,ओबीसी संघर्ष समितीसह इतर संघटना सातत्याने मुख्यमंर्त्याकडे निवेदनातून ही मागणी

# आ.चंद्रिकापूरेंच्या हस्ते आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन



**गोंदिया:** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमीत्त जिल्ह्यात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून आज सोमवारला येथील ग्रामीण रुग्णालयात या भव्य तालुका आरोग्य मेळावाचा उद्घाटन आमदार मनोहर चांद्रिकापुरे यांचा हस्ते करण्यात आले.यावेळी तालुक्यातील गावखेड्यातून आलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या मेळाव्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर/ गोंदिया येथील सर्व तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची वैद्यकीय तप-ासणी व रोगनिदान करून औषधोपचार केले. सर्व नागरिकांनी या सुवर्ण संधीचा फायदा घ्यावा व आपले रोगाचे निदान करून औषधोपचार करून घ्यावे असे आवाहन करीत राज्य सरकारच्यावतीने जनहितासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती आमदार चंद्रिकापुरे यांनी दिली. मेळाव्याला नगराध्यक्ष तेजराम मडावी, वंदना डोंगरवार उपाध्यक्ष, महेंद्र वंजारी बांधकाम सभापती, डॉ. भुमेश्वर पटले जि.प.सदस्य, डॉ.नितीन वानखेडे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.अमरीश मोहबे जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ. हर्षवर्धन मेश्राम तालुका वैद्यकीय अधिकारी, डॉ. स्वर्णा हुबेकर, डॉ. जयंती पाटील, डॉ.विनोद भुते, शशिकला टेभूर्णे नगरसेविका, अश्लेश अंबादे नगरसेवक, चेतन वडगाये प.स सदस्य, शालिंदर कापगते प.स सदस्य, तसेच नागरिक उपस्थित होते.

# गोंदिया रेल्वेस्थानकावर ८८४ पॅनलद्वारे २७० केव्ही सौरऊर्जा निर्मिती

**गोंदिया:** गोंदिया रेल्वे स्थानकावरील सर्व विद्युत उपकरणे सध्या सौर उर्जेवर चालविली जात आहेत.यासाठी रेल्वे स्थानकाच्या फलाट क्र. ३ ते ६ वर सौर उर्जानिर्मितीसाठी एकूण ८८४ सौर पॅनल लावून २७० केव्ही उर्जानिर्मिती केली जात आहे.एका पॅनलपासूनसू ३२५ वॅट सौर उर्जानिर्माण केली जाते.यासाठी स्मार्ट इनव्हर्टर लावण्यात आले आहेत.



सौर उर्जेपासून तयार वीज आधी इनव्हर्टरला पुरवठा केली जाते.यासाठी ५० केव्हीचे ५ व २० केव्हीचे १ इनव्हर्टर लावण्यात आले आहेत. तसेच या ठिकाणाहून विजेचा पुरवठा करण्यासाठी डिस्ट्रीब्युशन पॅनल लावण्यात आले आहे. या ठिकाणी एक मीटर लावण्यात आले असून येथून थेट वीजेचा पुरवठा केला जातो. गोंदिया रेल्वेस्थानकाला जेवढ्या विजेची गरज आहे, त्यापैकी ९० टक्के वीजनिर्मिती सौर उर्जेपासून केली जात आहे. गोंदिया रेल्वे स्थानकाला एकूण ३५० केव्ही विजेची गरज असून त्यापैकी २७० केव्ही वीज निर्मिती ही सौर उर्जेपासून केली जात आहे.

याशिवाय पार्सल ऑफीसच्या छतावरही सौर पॅनल लावून ४० केव्ही स्वतंत्र वीज निर्मिती केली जात आहे. गोंदिया रेल्वे स्थानकाला गरज असलेल्या एकूण ३५० केव्ही विजेमध्ये पीट लाईन परिसरात उपयोग केल्या जाणाऱ्या विजेचा सुद्धा समावेश आहे.

# जिल्हा परिषद ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी कमलेश बिसेन यांची बिनविरोध निवड

**गोंदिया:** येथील जिल्हा परिषद ग्रामसेवक सहकारी पतसंस्था जिल्हा गोंदिया रंन.११६ च्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कमलेश बिसेन यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत पुन्हा त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. कोरोंनाकाळात निवडणूक प्रक्रिया थांबवण्यात आली होती, परिस्थिती सामान्य होताच सहकार विभागाने जिल्हा उपनिबंधक यांच्या मार्फत निवडणुक निर्णय अधिकारी श्री माथूलकर यांनी निवडणुकीची प्रक्रीया पूर्ण केली.

गोंदिया जिल्हा परिषद ग्रामसेवसक सहकारी पत संस्था मर्या.गोंदिया.र.नं.११६ च्या सन २०२२-२०२७ या कालावधी करीता संचालक मंडळाची अविरोध निवड करण्यात आली. त्यामध्ये नवनिर्वाचित संचालकांमध्ये कमलेश व्ही. बिसेन (अध्यक्ष), दयानंद जी.फ टिंग (उपाध्यक्ष), भागेश्वर के.चव्हाण (खजिनदार), नरेद्र डी. अतकरी (तज्ञ संचालक), तारेश बी.कुबडे (तज्ञ संचालक), कु.ज्योति ई.बिसेन (कार्यरत संचालक), रामेश्वर आर. जमाईवार (संचालक), रविन्द्र बी.अंबादे (संचालक), ओम `श्वर जी.बिसेन (संचालक), सचिन व्ही. कुथे (संचालक), निशा एम.टेंभरे (संचालक), सुरेंद्र एस. निघोट (संचालक), सु-नील बी.पटले (संचालक), कु.सिंधु आर.सूर्यवंशी (संचालक)यांचा समावेश आहे.



अतिशय विपरित परिस्तिथीमध्ये ग्रामसेवक /ग्राम विकास अधिकारी संवर्ग काम करीत असताना कुटुंबाकडे दुर्लक्ष होतो. त्यामुळे सामाजिक उत्तरदायित्व म्हणून संवर्गच्या आर्थिक सामाजिक व मानसिक बळकटीकरणाकरीता ही संस्था स्थापित केली असून जिल्ह्यात लवकरच ग्रामसेवक भवनाची हक्काची इमारत उभी करुन युनियन व संवर्गाकरीता सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबवून स्वप्न पूतीसाठी प्रयत्न करणार आहे. माझ्यावर संवर्गाने दाखविलेला विश्वास मी प्रामाणिकपणे सर्वांना सोबत फलश्रुतीकडे निश्चित नेणार असून मी कार्यमात्र अध्यक्ष असून संस्थेतील सर्व सभासद अध्यक्ष असल्याची प्रतिक्रिया नवनिर्वाचित अध्यक्ष कमलेश बिसेन यांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यात शुन्य कोरोना बाधित

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून १९ एप्रिल रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही. तर डिस्चार्ज रुग्णांची संख्या शुन्य आहे. आजपर्यंत ४६,२१४ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले. ४५,४९० रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित असलेले २ बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील ५८८ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.४४ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२७ टक्के आहे तर डब्लिंग रेट १५४.५ दिवस आहे.

# महागाईच्या तुलनेत रोहयोच्या मजुरीत वाढ केवळ आठ रुपये

**गोंदिया :** पेट्रोल, डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने महागाई दहा पट वाढली असून, सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे.अशात हातावर पोट असणाऱ्यांचे सर्वाधिक हाल होत आहेत. महागाई आकाशाला भिडलेली असताना केंद्र सरकारने मनरेगाच्या मजुरीत केवळ ८ रुपयांनी वाढ करून मजुरांची एकप्रकारे थट्टाच केली आहे.



रोजगार हमी योजनेच्या मजुरीत केवळ ८ रुपयांची दरवाढ करण्यात आली असून, एप्रिलपासून मजुरांना २५६ रुपये मजुरी मिळणार आहे. मजुरांच्या हाताला काम मिळावे व त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण व्हाव्यात, यासाठी शासनाने रोजगार हमी योजना सुरु केली. मजुरांना होणारे फायदे लक्षात घेता, ही योजना संपूर्ण देशात लागू करण्यात आली.

या योजनेत अनेक प्रकारचे लाभ शेतकरी घेऊ शकतात. म जुरीची रक्कम लाभार्थी व मजुरांच्या बँक खात्यात जमा होते. शेततळे व फळबाग लागवड हे घटक शेतीतून स्थिर उत्पन्न मिळवून देण्यासाठी ही योजना खूप महत्त्वाची ठरत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात मजुरांच्या हाताला काम मिळावे व सिंचन क्षेत्र वाढावे, यासाठी रोहयो अंतर्गत विविध योजना गावपातळीवर राबविल्या जातात.म ातीनाला, बांध या सारखी कष्टाची कामे मजुराला करावी लागतात.

**जिल्ह्यात ३ हजार कामे सुरु**

**२०२१-२२ या वर्षात २४८ रुपये मजुरी मिळत होती.आता त्यात आठ रुपयांनी वाढ केल्याने २५६ रुपये मजुरी दिली जात आहे. जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार यंदा जिल्ह्यात ३ हजारांच्यावर कामे सुरु आहेत.**

**ग्रामीण भागातील जनतेला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजनेच्या मजुरीत गेल्या वषी अत्यल्प वाढ करण्यात आली होती.यंदा राज्यातील दुष्काळी स्थिती,वाढत्या महागाईचा विचार होऊन मजुरीत वाढ होईल,असे अपेक्षित होते.मात्र,केवळ आठ रुपयांची वाढ करून सरकारने मजुरांची थट्टा केली आहे.**

**- हौसलाल रहांगडाले, जिल्हाध्यक्ष, आयटक**

# राष्ट्रीय बाल आरोग्य योजना ठरली संजीवनी

## जिल्ह्यातील ६५ हृदयरुग्ण बालकांची मोफत शस्त्रक्रिया

**गोंदिया: -** हृदयरोग असलेल्या ६५ बालकांवर किरकोळ व गंभीर स्वरुपाच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्याने राष्ट्रीय बाल आरोग्य योजना जिल्ह्यातील बालकांसाठी जनसंजीवनी ठरली आहे. विशेष म्हणजे, गुंतागुंतीच्या हृदयविकारांवर राज्याबाहेर जाऊन ही शस्त्रक्रिया करण्यात आल्या.



अंगणवाडी व शालेय मुलांची आरोग्य तपासणी करुन त्यांच्यात आढळून आलेल्या आजारांवर वेळीच उपचार करणे व आजारांना पायबंद घालण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम एप्रिल २०१३ पासून राबविला जातो. ० ते १८ या वयोगटातील मुला-मुलींची आरोग्य तपासणी व त्यांच्या आजारांवर या योजनेतून मोफत उपचार केले जातात. एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्ह्यासह भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यांमध्ये या योजनेद्वारे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यात गोंदिया जिल्ह्यातील ६५ बालकांची नोंद झाली. यातील संपूर्ण म्हणजेच ६५ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आली.

**३३ रुग्णालयात शस्त्रक्रिया**

मागील शैक्षणिक वर्षात सहा जिल्ह्यातील ३८१ बालकांवर ३३ रुग्णालयात शस्त्रक्रिया झाल्या. यात वर्धा सावंगी मेघे हॉस्पीटलमध्ये सर्वाधिक १७२ शस्त्रक्रिया झाल्या. नागपूर बाहेर सत्यसाई हॉस्पिटल, रायपूर येथे २८, सत्यसाई हॉस्पिटल मुंबई येथे ७, कोकिळाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल मुंबई येथे ३, एसआसीसी मुंबई येथे ७ तर ज्युपिटर हॉस्पिटल मुंबई, कस्तुरबा हॉस्पिटल मुंबई, रिलायन्स हॉस्पिटल, मुंबई, हार्ट हॉस्पिटल बंगरुळ येथील व फोर्टिस हॉस्पिटल, चंदीगड येथे प्रत्येकी एक शस्त्रक्रिया झाली.

**अशी राबविली जाते योजना**

प्रत्येक शैक्षणिक वर्षात अंगणवाडी बालकांसाठी दोनदा तर शालेय विद्यार्थ्यांसाठी एकदा आरोग्य तपासणीचे आयोजन केले जाते. यातील किरकोळ आजाराचे निदान झालेल्या बालकांवर शाळेतच उपचार केले जातात. तर गंभीर आजारांचे निदान झालेल्या बालकांवर जिल्हा रुग्णालय पुढील उपचार करून त्यांचा पाठपुरावा केला जातो.